१६.०१.२०२५	दि.२२.१२.२०२४ रोजीच्या रात्री ११.४५ पासुन ते दिनांक २३.१२.२०२४ च्या सकाळी ०७.०० वाजेपर्यंतचे व दिनांक २३.१२.२०२४ रोजीचे दुपारचे १२.०० वाजेपासुन ते ०५.०० वाजेपर्यंतचे सातारा पोलीस स्टेशन मधील सर्व सीसीटीव्ही फुटेज द्यावे,

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे विधीज्ञ यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पोलीस स्टेशन सातारा या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे त्यांचेकडे माहिती मागणी केलेली आहे. त्यानुसार सातारा पोलीस स्टेशन यांनी असे कळविलेले आहे की, अर्जदार हे उद्दिग्न व्यक्ती असल्यामुळे तसेच पोलीस ठाणे सातारा येथे तक्रारदार येतात त्या व्यतिरिक्त पोलीस ठाणेला कायद्याची अंमलबजावणी करता मदत करणारे व्यक्ती देखील येतात, पोलीस ठाणेला येणारे तक्रारदार यांचे गोपनियतेचा भंग होऊ नये तसेच कायदा

अंमलबजावणीकरिता मदत करणारे व्यक्ती यांची ओळख प्रसारित होऊ नये म्हणून अर्जदार यांना पोलीस ठाणे सातारा इमारत परिसराचे सीसीटीव्ही फुटेज देण्याची माहिती नाकारण्यात येत आहे. संबंधित सहायक जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, सातारा यांनी माहितीसंदर्भात सादर केलेली वस्तुस्थिती दि.१०.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना अवगत करण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२२.०४.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयामध्ये त्यांनी, पोलीस महासंचालक, मुंबई यांचेकडील दि.०६.०९.२०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार, जतन केलेले सीसीटीव्ही फुटेज तक्रारीच्या / घटनेच्या अनुषंगाने वैधानिक आयोग, मा.न्यायालय आणि संबंधित तपास यंत्रणा यांना संबंधित पोलीस स्टेशनचे अधिकारी सीसीटीव्ही फुटेज पाहण्यासाठी उपलब्ध करुन देऊ शकतात, कोणतीही उद्विग्न व्यक्ती यांना संबंधित पोलीस स्टेशनच्या प्राधिकृत अधिकाऱ्यास सीसीटीव्ही फुटेज पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्याची मागणी करण्याचा अधिकार नाही, परंतु सीसीटीव्ही फुटेजचे जतन करण्यासाठी फक्त सांगण्याचा त्यांना अधिकार आहे, अशा सुचना असल्याने सीसीटीव्ही फुटेज देता येत नाही, सीसीटीव्ही फुटेज जतन करणेबाबत सातारा पोलीस स्टेशनला कळविण्यात आले असल्याचे, नमूद करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे. या परिस्थितीत अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती पुरविण्यास नकार देण्यात आलेला आहे, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद दिला असल्याचे दिसुन येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद आणि अधिनियमातील तरतुदी यांचा सारासार विचार करता प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२२.०४.२०२५ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये अंशत: बदल करुन आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, उस्मानपुरा विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली केवळ अपिलार्थी यांचेशी संबंधित माहिती (उर्वरित सर्व माहिती वगळून) अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-२, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5260 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४२८५/२०२५
बोर्ड क्र.११

श्री.ब्रम्हदेव वासुदेव गावडे, — अपिलार्थी
रा.प्लॉट नंबर ४५/४६, पारिजात नगर, एन-४, सिडको,
छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहायक पोलीस आयुक्त,
उस्मानपुरा विभाग, छत्रपती संभाजीनगर, एस.बी.आय. बँकेच्या बाजुला, दशमेशनगर, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
पोलीस उपायुक्त,
परिमंडळ - २, छत्रपती संभाजीनगर, संभाजी कॉलनी, एन-६,
सिडको, सेंट्रल जकात नाक्याजवळ, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१८.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, श्री.मनिष कल्याणकर, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.शिवप्रसाद कऱ्हाळे, सहायक पोलीस निरीक्षक उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
०४.०६.२०२५	ध्वनी प्रदुषणामुळे पोलीस स्टेशन पुंडलिकनगर अंतर्गत गॅरेजवर कार्यवाही होणसंबंधाने आम्ही वेळोवेळी दिलेल्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीची माहिती, तक्रार अर्जाच्या तारखा दि.१८.१०.२०२४, दि.०५.१२.२०२४, दि.१२.०२.२०२५, दि.२९.०५.२०२५, १. नमूद अर्जाच्या नोंदी घेतलेल्या स्टेशन डायरीचे उतारे सत्यप्रती, २. अर्जावर केलेल्या कार्यवाहीची सर्व संबंधित कागदपत्रांच्या सत्यप्रती, ३. आपले अधिनस्त पो.स्टे.ला यास अनुसरुन मा.पोलीस आयुक्त, मा.पोलीस उपायुक्त, मा.सहायक पोलीस आयुक्त यांचे कार्यालयाकडुन प्राप्त अर्ज व त्या समवेतच्या पत्रांच्या छायांकित सत्यप्रती, ४. नमूद कालावधीदरम्यान डायल ११२ च्या संबंधाने असलेल्या सर्व नोंदीच्या सत्यप्रती स्टेशन डायरीच्या उताऱ्यासह, ५. अर्ज रजिस्टरवर नोंदविलेल्या अर्जाच्या नोंदीच्या सत्यप्रती,

	६. महाराष्ट्र प्रदुषण महामंडळ यांनी जयभद्रा गॅरेजवर कार्यवाही करणेबाबत पत्राव्दारे कळविलेले आहे, त्या पत्राची छायांकित सत्यप्रत व त्यावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रत,

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती परिपूर्ण मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती अपूर्ण आहे. त्यामुळे माहिती अर्जातील मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.११.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देण्यात येऊन, अपिलार्थी यांनी मागणी केलेली, अभिलेखात उपलबध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरची माहिती / वस्तुस्थिती अपिलार्थी यांनी दि.१६.०७.२०२५ रोजी व्यक्तिश: स्विकारुन पोच दिलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.३१.०७.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, सात दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन दि.१७.११.२०२५ रोजीच्या पत्रासोबत ७० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना देण्यात आलेली आहे. तथापि अपिलार्थी यांचे समाधान होत नाही. अपिलार्थी हे पोलीस विभागात पोलीस अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. या परिस्थितीत अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, दोन मुद्याची माहिती फेटाळल्याने, ३ मुद्याची माहिती अल्पशी व तीपण अपूर्ण स्वरुपात दिल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अपूर्ण माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. तथापि उपलब्ध करुन दिलेली माहिती अपूर्ण असल्याचे अपिलार्थी यांनी आज रोजी सुनावणीदरम्यान अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, उस्मानपुरा विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती (पूर्वी दिलेली माहिती वगळून) अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-२, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5261 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १०१६, १०१७ व १०१८/२०२५ (०३)
बोर्ड क्र.१२, १३ व १४

श्री.गिरीश म.यादव, — अपिलार्थी
रा.पंचमुखी हनुमान मंदिराजवळ, लक्ष्मीनारायण चौक, मोदीखाना,
सदर बाजार, जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
जालना पाटबंधारे विभाग, जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
जालना पाटबंधारे विभाग, जालना — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१०.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये तीन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.आर.एन.वाघमारे, लिपिक, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.व्ही.आर.वाघमारे, उपविभागीय अभियंता उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या तीन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
१२	०३.१०.२०२४	पदग्रहण घेतले पासुन ते देणेपर्यंत, कार्यकारी अभियंता (श्री.एस.बी.कोरके) जालना पाटबंधारे विभाग, जालना येथे पदग्रहण घेतले पासुन केलेल्या कामाची यादी, कामाचे स्वरुप, गावाचे नाव, कामनिहाय रक्कम रुपये, काम पूर्ण किंवा अपूर्ण याबाबत माहिती, लेखाशिर्षनिहाय करण्यात आलेल्या कामबाबत अहवालसहित सविस्तर तपशिल माहिती,
१३	०३.१०.२०२४	दि.०१.०४.२०२०-२१-२२-२३-२४ ते देणेपर्यंत, कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, जालना अंतर्गत केलेल्या कामाचे एम.बी.नोंदवहीचा प्रत्येक पानावर सही-शिक्कासहीत माहिती,
१४	०३.१०.२०२४	सन २०२१-२२-२३-२४ ते देणेपर्यंत, वरील कालावधीत लेखाशिर्षनिहाय देण्यात आलेल्या एजन्सीनिहाय, कॉन्ट्रॅक्टर निहाय, मजुर सहकारी संस्था निहाय धनादेश विवरणाची माहिती, कोणाच्या नावे किती रक्कम अदा करण्यात आली व त्या कामाच्या मोबदल्यात चेक देण्यात आले त्याबाबतची माहिती, चेक बुकच्या शेवटच्या पानाची (अभिलेख पर्ची, रेकॉर्ड व काऊंटर स्लीप व आरटीजीएसची) सही शिक्कासहीत प्रती,

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जातील मागणीनुसार माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास विलंब केला असल्यामुळे नुकसान भरपाई मंजूर करण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयाच्या अधिनस्त सहायक जन माहिती अधिकारी यांचे कलम ५ (४) नुसार सहाय्य घेतलेले आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलांवर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आदेश देऊन जन माहिती अधिकारी यांनी आज दिनांक पावेतो माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्यामुळे अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोठ्या कालावधीची आहे. तथापि अशा स्वरुपातील माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असे माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाहीत. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांच्या विचाराधिन व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या अनुषंगाने असे निदर्शनास आणुन देण्यात येत आहे की, अपिलार्थी यांनी यापूर्वी आयोगाकडे दाखल केलेल्या २०६ व्दितीय अपिलांवर आयोगाने दि.०१.१०.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे अपिलार्थी यांच्या मोठ्या प्रमाणावर माहिती अर्ज व त्या अनुषंगाने व्दितीय अपिले सादर करण्याच्या भूमिकेबाबत आणि अशा भूमिकेमुळे सार्वजनिक प्राधिकरणातील दैनंदिन कामकाजाचा होत असलेला खोळंबा याबाबत मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय, मा.केंद्रीय माहिती आयोग, राज्य माहिती आयोग यांनी वेळोवेळी पारित केलेल्या निर्णयाच्या प्रकाशात आयोगाने अपिलार्थी यांची सर्व २०६ व्दितीय अपिले फेटाळलेली आहेत. असा निर्णय आयोगाच्या www.sic.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर आयोगाने दिलेले निर्णय या सदराखाली प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

उपरोक्त तीन व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहेत.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5262 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १०१९/२०२५
बोर्ड क्र.१५

श्री.गिरीश म.यादव,
रा.पंचमुखी हनुमान मंदिराजवळ, लक्ष्मीनारायण चौक, मोदीखाना,
सदर बाजार, जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रमुख लिपिक,
जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, प्रशासकीय इमारत,
दुसरा मजला, अंबड रोड, जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा अधीक्षक,
भूमि अभिलेख कार्यालय, प्रशासकीय इमारत, दुसरा मजला,
अंबड रोड, जालना — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१०.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
२८.०८.२०२४	दि.१९.०८.२०२४ ते देणेपर्यंत, दि.१९.०८.२०२४ रोजीचा तक्रार अर्ज निगडित झालेल्या कार्यवाहीचा तपशिल, कार्यवाही न झाल्याची कायदेशीर कारणे, तसेच संबंधित अर्जावर होणाऱ्या कार्यवाहीचा जी.आर. तत्सम नियम तसेच कार्यवाही न करणाऱ्या अधिकाऱ्यावर होणाऱ्या कार्यवाहीचा जी.आर., चौकशी रोजनामा आदेशाची सर्व कागदपत्राची संचिकांचा प्रत्येक पानावर सही शिक्का सहीत माहिती,

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जातील मागणीनुसार माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास विलंब केला असल्यामुळे नुकसान भरपाई मंजूर करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मुदतीत माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्यामुळे अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०७.११.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयामध्ये त्यांनी, अर्जदार

यांना माहिती पुरविण्यात आली आहे, अर्जदार प्रथम अपील सुनावणीस हजर नसल्याने त्यांना सुनावणी स्वारस्य असल्याचे दिसुन येत नाही, असे नमूद करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे. या प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर पारित केलेला निर्णय विचारात घेता, अपिलार्थी यांनी आयोगासमक्ष माहिती मिळाली नसल्याचा केलेल्या युक्तिवादात आयोगास कोणताही तथ्यांश दिसुन येत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांच्या विचाराधिन व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या अनुषंगाने असे निदर्शनास आणुन देण्यात येत आहे की, अपिलार्थी यांनी यापूर्वी आयोगाकडे दाखल केलेल्या २०६ व्दितीय अपिलांवर आयोगाने दि.०१.१०.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे अपिलार्थी यांच्या मोठ्या प्रमाणावर माहिती अर्ज व त्या अनुषंगाने व्दितीय अपिले सादर करण्याच्या भूमिकेबाबत आणि अशा भूमिकेमुळे सार्वजनिक प्राधिकरणातील दैनंदिन कामकाजाचा होत असलेला खोळंबा याबाबत मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय, मा.केंद्रीय माहिती आयोग, राज्य माहिती आयोग यांनी वेळोवेळी पारित केलेल्या निर्णयाच्या प्रकाशात आयोगाने अपिलार्थी यांची सर्व २०६ व्दितीय अपिले फेटाळलेली आहेत. असा निर्णय आयोगाच्या www.sic.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर आयोगाने दिलेले निर्णय या सदराखाली प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात ठपरोक्त सर्व बाबी विचारात घेता, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील फेटाळण्यात येत आहेत.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5263 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २६२२/२०२५
बोर्ड क्र.१६

श्री.गिरीश म.यादव,
रा.पंचमुखी हनुमान मंदिराजवळ, लक्ष्मीनारायण चौक, मोदीखाना,
सदर बाजार, जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, जालना — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२६.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
२४.०१.२०२५	दि.०१.०४.२०१९-२०-२१-२२-२३-२४-२५ पर्यंत पाराशर हमाल कामगार सहकारी संस्था लि. पारध, ता.भोकरदन, जि.जालना यांना आपल्या कार्यालयामार्फत दिलेल्या सर्व रक्कमेची सविस्तर वर्षनिहाय माहिती द्यावे, संबंधित संस्थेने माथाडी कामगार मंडळास ३० % लेव्ही मंजुरी महागाई निर्देशांकाची रक्कम अदा केलेली सविस्तर वर्षनिहाय माहिती द्यावे, दि.१५.०९.२०१८ पत्र जा.क्र.२१६ माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ जालना यांच्या पत्राची प्रत द्यावे,

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जातील मागणीनुसार माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास विलंब केला असल्यामुळे नुकसान भरपाई मंजूर करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊन सुध्दा माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्यामुळे अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०९.०४.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयामध्ये त्यांनी, संचिका अवलोकनास्तव उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी

माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोठ्या कालावधीची असल्याचे दिसुन येत आहे. तथापि अशा स्वरुपातील माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असे माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाहीत. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांच्या विचाराधिन व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या अनुषंगाने असे निदर्शनास आणुन देण्यात येत आहे की, अपिलार्थी यांनी यापूर्वी आयोगाकडे दाखल केलेल्या २०६ व्दितीय अपिलांवर आयोगाने दि.०१.१०.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे अपिलार्थी यांच्या मोठ्या प्रमाणावर माहिती अर्ज व त्या अनुषंगाने व्दितीय अपिले सादर करण्याच्या भूमिकेबाबत आणि अशा भूमिकेमुळे सार्वजनिक प्राधिकरणातील दैनंदिन कामकाजाचा होत असलेला खोळंबा याबाबत मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय, मा.केंद्रीय माहिती आयोग, राज्य माहिती आयोग यांनी वेळोवेळी पारित केलेल्या निर्णयाच्या प्रकाशात आयोगाने अपिलार्थी यांची सर्व २०६ व्दितीय अपिले फेटाळलेली आहेत. असा निर्णय आयोगाच्या www.sic.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर आयोगाने दिलेले निर्णय या सदराखाली प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील फेटाळण्यात येत आहेत.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5264 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १०७५/२०२५
बोर्ड क्र.१७

श्री.वासुदेव सुर्यकांत जहागिरदार (पैठणकर),
रा.घर क्र.०२.०४.१७, मिल्स कॉलनी, कोतवालपुरा,
छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा न्यायाधीश-१,
जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१७.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, श्री.नितीन राजेश मराठे उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचेवतीने श्री.नितीन राजेश मराठे, प्रबंधक उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
०४.०८.२०२५	--पैठण येथील दिवाणी न्यायालयात खोट्या नावाने दावा क्र.५३/९७ दि.२६.०२.१९९७ दाखल झालेला असुन सर्व दावा अद्याप निकाली काढलेला नाही, सदर दावा दि.०४.०८.२००२ रोजी काढुन घेतल्यानंतर त्या दाव्यात वादीने प्रतिवादी विरुध्द जे हक्क मागितले आहे ते पैठण न्यायालयात दावा सिध्द न झाल्यामुळे आपोआप रद्द ठरतात, कारण जर दावा २००२ साली परत घेतला व आजतागायत नवीन दावा दाखल केलेला नाही, तसेच सदर दाव्यात अद्याप साक्षीपुरावा झालेला नाही, तरीही सदर दाव्यातील वादी स्वयंघोषित रघुनाथ नारायण गोसावी ऊर्फ राजेंद्र वसंत पांडव या दाव्यानुसार त्यांनी मागितलेले हक्क उपभोगित आहे. त्यामुळे त्यातील प्रतिवादी यांचे अपरिमित नुकसान होत आहे, त्यामुळे आपणास विनंती की, सदर दावा साक्षीपुरावा न होता त्यातील अधिकार श्री.स्वयंघोषित रघुनाथ नारायण गोसावी व ऊर्फ राजेंद्र वसंत पांडव यांना कुठल्या अधिकारात देण्यात आले हे माहिती अधिकारात कळवावे,

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जातील मागणीनुसार माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी दाखल केलेला माहिती

अर्ज हा, महाराष्ट्र जिल्हा न्यायालय माहिती अधिकार नियम २००९ मधील तरतुदीनुसार परिपूर्ण नसून मागणी केलेली माहिती कलम १३ (बी) नुसार उघड करण्यास अपवाद ठरविण्यात आलेली माहिती आहे. तसेच अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही मोघम, संदिग्ध, प्रश्नार्थक, कायदेशीर मत, सल्ला मागणी स्वरुपाची असल्यामुळे ती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहितीच्या व्याख्येत मोडत नसल्यामुळे देय होत नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.०८.०९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थी यांच्या माहिती अर्जातील वस्तुस्थिती अपिलार्थीस अवगत करुन माहिती पुरविता येत नसल्याचे कळविण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२५.०९.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात केलेली कृती अधिनियमातील तरतुदीशी ससुंगत असल्याचा निष्कर्ष काढुन प्रथम अपील नामंजूर केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ करुन अर्ज एकतर्फी निकाली काढला, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्यामुळे अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद दिला असल्याचे दिसुन येत आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार ज्यावेळी माहितीचा अर्ज प्राप्त होतो त्यावेळी जी माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे ती त्याच स्वरुपात उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. माहिती तयार करुन देणे, माहितीचे संस्करण करुन देणे, प्रश्नार्थक माहिती देणे, एखादी कार्यवाही करुन माहिती देणे, एखाद्या कार्यवाहीमागील कारण / खुलासा देणे, भविष्यात माहिती प्राप्त होईल म्हणून माहितीचा अर्ज प्रलंबित ठेवणे, या प्रक्रियेंचा अथवा या स्वरुपातील माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद आणि अधिनियमातील तरतुदी यांचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२५.०९.२०२५ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील निकाली काढयात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5265 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४९०७/२०२५
बोर्ड क्र.१८

श्री.गणेश भाऊसाहेब बोडखे, — अपिलार्थी
रा.प्लॉट नंबर पी-२०, एम.आय.डी.सी. पैठण,
ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
जिल्हा न्यायाधीश-१,
जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१७.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, श्री.नितीन राजेश मराठे उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचेवतीने श्री.नितीन राजेश मराठे, प्रबंधक उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
२२.०७.२०२५	Request for Information regarding Ministerial / Public Acts under the Provisions of the Sarfaesi Act, २००२ बाबत २९ मुद्यांवर माहिती,

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जातील मागणीनुसार माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे २९ मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. अपिलार्थी यांनी दाखल केलेलां माहिती अर्ज हा, महाराष्ट्र जिल्हा न्यायालय माहिती अधिकार नियम २००९ मधील तरतुदीनुसार परिपूर्ण नसून मागणी केलेली माहिती कलम १३ (बी) नुसार उघड करण्यास अपवाद ठरविण्यात आलेली माहिती आहे. तसेच अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही मोघम, संदिग्ध, प्रश्नार्थक, कायदेशीर मत, सल्ला मागणी स्वरुपाची असल्यामुळे ती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहितीच्या व्याख्येत मोडत नसल्यामुळे देय होत नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.१८.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थी यांच्या माहिती अर्जातील वस्तुस्थिती अपिलार्थीस अवगत करुन माहिती देय होत नसल्याचे कळविण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२६.०९.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात केलेली कृती अधिनियमातील तरतुदीशी ससुंगत

असल्याचा व जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयामध्ये हस्तक्षेप करण्याची आवश्यकता नसल्याचा निष्कर्ष काढुन प्रथम अपील नामंजूर केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ करुन अर्ज एकतर्फी निकाली काढला, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्यामुळे अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद दिला असल्याचे दिसुन येत आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार ज्यावेळी माहितीचा अर्ज प्राप्त होतो त्यावेळी जी माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे ती त्याच स्वरुपात उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. माहिती तयार करुन देणे, माहितीचे संस्करण करुन देणे, प्रश्नार्थक माहिती देणे, एखादी कार्यवाही करुन माहिती देणे, एखाद्या कार्यवाहीमागील कारण / खुलासा देणे, भविष्यात माहिती प्राप्त होईल म्हणून माहितीचा अर्ज प्रलंबित ठेवणे, या प्रक्रियेंचा अथवा या स्वरुपातील माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (पहिली सुधारणा) २०१२ नुसार अपिलार्थी यांना एका माहिती अर्जात एका विषयावर १५० शब्दाच्या मर्यादेत माहितीची मागणी करणे अनुज्ञेय आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे माहितीची मागणी करताना ती १५० पेक्षा अधिक शब्दांव्दारे केली असल्याचे निदर्शनास येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद आणि अधिनियमातील तरतुदी यांचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२५.०९.२०२५ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील निकाली काढयात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5266 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १३३/२०२५
बोर्ड क्र.१९

श्री.राजेंद्र बाबुराव राऊत, — अपिलार्थी
रा.स्वामी विवेकानंद नगर, एन-१२, हडको, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जटवाडा,
ता.जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जटवाडा,
ता.जि.छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०९.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
१६.०८.२०२४	१.कॅश बुक, २. लॉग बुक, ३. नमुना नंबर ३२, ४. नमुना नंबर ३३, ५. किचन बुक, ६. बँक स्टेटमेंट, ७. हालचाल रजिस्टर, ८. चेक वाटप रजिस्टर, ९. चेक जमा रजिस्टर, १०. आवक जावक रजिस्टर निहाय, १०.पगार वाटप रजिस्टर, ११. खिचडी चव रजिस्टर, १२ बिलाच्या सत्यपती सह सविस्तर माहिती, सन २०२२ ते २०२४ पर्यंत,

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती व प्रथम अपील अर्जाची दखल घेतली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कार्यवाही केलेली नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत

स्वरुपाची असुन ती एका पेक्षा अधिक विषयाशी निगडित आहे. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (पहिली सुधारणा) २०१२ नुसार अपिलार्थी यांना एका माहिती अर्जामध्ये एका विषयावर (माहिती अर्जातील पहिल्या विषयावर) माहिती अनुज्ञेय आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जटवाडा, ता.जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहित तरतुदीनुसार देय होणारी एका विषयावरील माहिती (माहिती अर्जातील पहिल्या विषयाची माहिती), आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जटवाडा, ता.जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार मुदतीत सुसंगत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह दि.१०.०६.२०२६ रोजी **वेळ सकाळी ११.०० वा. आयोगासमोर व्यक्तिशः** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१८.०९.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5569 दिनांक : 19/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ७१४/२०२५
बोर्ड क्र.२०

श्री.पठाण कलीम खान बिस्मिला खान, — अपिलार्थी
रा.बोरगाव सारवणी, ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
जेष्ठ शिक्षक,
स्वातंत्र सैनिक श्री.सरीचंद देलचंद राठोड माध्यमिक विद्यालय,
हनुमंतखेडा, ता.सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याध्यापक,
स्वातंत्र सैनिक श्री.सरीचंद देलचंद राठोड माध्यमिक विद्यालय,
हनुमंतखेडा, ता.सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१४.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
२१.१०.२०२४	आपल्या महाविद्यालय मधील श्री.राहुन पुंडलिक पवार लिपिक / सहशिक्षक यांची नियुक्ती आदेश, संस्था / शिक्षण विभागाने दिलेल्या पूर्व परवानगी आदेश, वैयक्तिक मान्यता, सेवा सातत्य मान्यता प्रस्ताव, नियुक्ती आदेश / संपूर्ण प्रस्ताव / पेपर जाहिरात / घेण्यात आलेली मुलाखत तसेच राहुल पुंडलिक पाटील यांच्या शैक्षणिक सर्व कागदपत्रे माहिती तसेच सन जानेवारी २०२० ते डिसेंबर २०२३ या दोन्ही महिन्याच्या मस्टर रजिस्टरची माहिती

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन चुकीच्या पध्दतीने प्रथम अपील निकाली काढलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाची दखल घेतली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार नियमानुसार कोणतीही व कसलीही कार्यवाही व जबाबदारी पूर्ण केली नाही, असे

कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कार्यवाही केलेली नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती एका पेक्षा अधिक विषयाशी निगडित आहे. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (पहिली सुधारणा) २०१२ नुसार अपिलार्थी यांना एका माहिती अर्जामध्ये एका विषयावर (माहिती अर्जातील पहिल्या विषयावर) माहिती अनुज्ञेय आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा जेष्ठ शिक्षक, स्वातंत्र सैनिक श्री.सरीचंद देलचंद राठोड माध्यमिक विद्यालय, हनुमंतखेडा, ता.सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहित तरतुदीनुसार देय होणारी एका विषयावरील माहिती (माहिती अर्जातील पहिल्या विषयाची माहिती), आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा जेष्ठ शिक्षक, स्वातंत्र सैनिक श्री.सरीचंद देलचंद राठोड माध्यमिक विद्यालय, हनुमंतखेडा, ता.सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार मुदतीत सुसंगत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.१०.०६.२०२६ रोजी वेळ सकाळी ११.०० वा. आयोगासमोर व्यक्तिशः** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र२।।३

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5568 दिनांक : 19/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे 19/5/2026

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संगाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १६४१/२०२५
बोर्ड क्र.२१

श्री.नितीन रामभुल बेद, · अपिलार्थी
रा.नितीनगर, कन्नड, ता.कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
सावित्रीबाई फुले कन्या हायस्कूल, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
मुख्याध्यापक,
सावित्रीबाई फुले कन्या हायस्कूल, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२५.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
१५.०१.२०२५	सन २००३-०४ ते २०१७-१८, शाळेतील सफाई कामगार / स्विपर कामगाराची नियुक्ती, निवृत्ती व कार्यकाळासह सालनिहाय यादी मिळणेबाबत,

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती व प्रथम अपील अर्जाची दखल घेतली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देणेबाबत कोणतेही आदेश नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कार्यवाही केलेली नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, सावित्रीबाई कन्या हायस्कूल, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व

अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, सावित्रीबाई कन्या हायस्कूल, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार मुदतीत सुसंगत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह दि.१०.०६.२०२६ रोजी वेळ सकाळी ११.०० वा. आयोगासमोर व्यक्तिशः उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१८.०२.२०२५ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5567 दिनांक : 19/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १०४८ व १०४९/२०२५ (०२)
बोर्ड क्र.२२ व २३

श्री.अजिम कासिम पटेल,
रा.सिडको रोड, फैज कॉम्प्लेक्स, मलिक अंबर नगर, रहेमानिया कॉलनी, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
नुरुल हुदा प्रायमरी एज्युकेशन सोसायटी संचलित मरियल उल उलूम उर्दू प्राथमिक शाळा, म्हाडा कॉलनी, शहाबाजार,
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
नुरुल हुदा प्रायमरी एज्युकेशन सोसायटी संचलित मरियल उल उलूम उर्दू प्राथमिक शाळा, म्हाडा कॉलनी, शहाबाजार,
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.११.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
२२	१३.०८.२०२४	१.सायरा बेगम अब्दुल अजिम यांचे विनंती अर्ज, २.शालेय समितीचे नियुक्ती आदेश, ३. मोमीन सायरा बेगम शिक्षण सेवक पदावर रुजू झाल्याचा अर्ज, ४. परिशिष्ट १ (शेड्युल वन) ची प्रत, ५. शिक्षण सेविकाचा कार्यकाळ संपल्यानंतर सहशिक्षिका म्हणून आदेशाची प्रत, ६. सध्या कार्यरत असलेल्या सहशिक्षिका ऐवजी मुख्याध्यापिका म्हणून नियुक्ती झालेले जि.प.आदेशाची प्रत, ७. शाळेची २०२३-२४, २०२४-२५ ची संच मान्यता कार्यरत असलेल्या सहशिक्षिकांची नावे व पदे, सन २०१० ते २०११
२३	१३.०८.२०२४	१. नुरुल हुदा प्रायमरी एज्युकेशन सोसायटी संचलित मरियम उल उलुम उर्दू प्राथमिक शाळा, म्हाडा कॉलनी, शहाबाजार येथे असुन या शाळेत कार्यरत असलेले सहशिक्षिका मोमीन सायरा बेगम अब्दुल अजिम यांचे नेमणूक, सेवा सातत्यास आदेशाची प्रत, २. भरती विषय शासनामार्फत पूर्व परवानगी मान्यतेची प्रत, ३. दैनिक वर्तमानपत्रात दिलेली भरती विषय जाहिरात, ४. मोमीन सायरा बेगम यांची

		२०-१०-२०११ ची संच मान्यता, ५. जाहिरात प्रमाणे भरती विषय उमेदवाराचे अर्जाची यादी (मुलाखात यादी), ६. शालेय समितीच्या ठरावाची सत्यप्रत, सन २०१० ते २०११

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ करित असुन दिशाभूल करित आहे, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असुन माहितीचा कालावधी २०१०-२०११ असा आहे. अशा स्वरुपातील माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असे माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाहीत. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत. या प्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेली बहुतांश माहिती ही त्रयस्थपक्षाशी संबंधित असुन मागणी केलेल्या अशा माहितीमध्ये अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) नुसार कोणतेही जनहित दिसुन येत नाही. त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर अधिनियमातील कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार त्रयस्थपक्षास त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे, ही बाब नैसर्गिक न्याय व पारदर्शकेतच्या दृष्टीकोनातुन योग्य ठरते. या नंतर माहिती प्रगट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. मात्र अपिलार्थी यांनी त्रयस्थपक्षाशी संबंधित मागणी केलेल्या माहितीमध्ये कोणतेही जनहित दिसनु येत नाही.

प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांचे लक्ष मा.सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्याय व इतर अपील नं.६४५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी पारित केलेल्या निर्णयाकडे वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

प्रस्तु प्रकरणात, उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

<u>आदेश</u>

उपरोक्त दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5271 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २०९२/२०२५
बोर्ड क्र.२४

श्री.अनवर हुसैन हाजी मोईनोद्दीन, अपिलार्थी
रा.मोहल्ला इनाम बाडा, खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ अल इरफान माध्यमिक व उच्च माध्यमिक स्कुल, सुलिभंजन, : उत्तरवादी क्र.१
ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर

२ मुख्याध्यापक, : उत्तरवादी क्र.२
अल इरफान माध्यमिक व उच्च माध्यमिक स्कुल, सुलिभंजन,
ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२६.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित शाळेचे विधीज्ञ श्री.इस्ताकी अहेमद पटेल उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
२३.०१.२०२५	मौजे सुलिभंजन ता.खुलताबाद येथील गट नं.८ मध्ये जमिनीची माहिती मिळणेबाबत, वरील विषयी, मौजे सुलिभंजन ता.खुलताबाद येथील गट नं.८ मध्ये आपल्या संस्था व शाळाच्या नावाने एकुण जमीन किती आहे त्या बद्दल नकाशाची माहिती द्यावे,

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जातील मागणीनुसार माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

अल इरफान माध्यमिक व उच्च माध्यमिक स्कुल, सुलिभंजन या शाळेचे विधीज्ञ यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी अल इरफान माध्यमिक व उच्च माध्यमिक स्कुल या शाळेकडे माहिती अधिकारातंर्गत माहिती अर्ज सादर करुन माहितीची मागणी केलेली आहे. तथापि या शाळेस शासनाचे कोणतेही अनुदान प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष स्वरुपात प्राप्त होत नसल्यामुळे सदर शाळेस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नाहीत आणि सदर शाळेस माहिती अधिकारातंर्गत माहिती उपलब्ध करुन देणे बंधनकारक असणार नाही. त्यामुळे अर्जदार यांनी माहिती अधिकारातंर्गत मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. सदर शाळेस शासनाकडुन अनुदान प्राप्त होत नसल्याबाबतची बाब विचारात घेऊन अर्जदाराचे आज रोजी आयोगासमोर विचाराधिन असलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्यामुळे अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान उत्तरवादी शाळेचे विधीज्ञ यांनी आयोगासमक्ष केलेला युक्तिवाद विचारात घेता, अपिलार्थी यांनी ज्या शाळेकडे माहिती अधिकारातंर्गत माहितीची मागणी केलेली आहे त्या

शाळेस शासनाचे कोणतेही अनुदान प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष स्वरुपात प्राप्त होत नाही. त्यामुळे अशा प्रकारच्या खाजगी शाळेचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (ज) मधील सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होणार नाही आणि पर्यायाने अशा प्रकारच्या खाजगी शाळेस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नाहीत. आज रोजी सुनावणीदरम्यान संबंधित शाळेच्या विधिज्ञांनी आयोगासमक्ष केलेल्या युक्तिवादाच्या पार्श्वभूमिवर नैसर्गिक न्याय तत्वास अनुसरुन अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याची व संयुक्तिक कागदपत्र सादर करण्याची संधी देण्यात आलेली आहे. मात्र अपिलार्थी यांच्या माहिती अर्जात नमूद शाळेस शासनाचे कोणतेही अनुदान प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष स्वरुपात प्राप्त असल्याबाबत अपिलार्थी आयोगास काहीही सांगू शकलेले नाहीत वा तशी कोणतीही संयुक्तिक कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर करु शकलेली नाहीत.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील निकाली काढयात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5131 दिनांक : 5/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २०९३/२०२५
बोर्ड क्र.२५

श्री.मोहम्मद सलिमोद्दीन हफीजोद्दीन, अपिलार्थी
रा.मोहल्ला साळीवाडा, खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ अल इरफान माध्यमिक व उच्च माध्यमिक स्कुल, सुलिभंजन, ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर : उत्तरवादी क्र.१

२ मुख्याध्यापक, अल इरफान माध्यमिक व उच्च माध्यमिक स्कुल, सुलिभंजन, ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२६.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यांत आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित शाळेचे विधीज्ञ श्री.इश्ताकी अहेमद पटेल उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
२३.०१.२०२५	शाळा स्थापन झाल्यापासुन ते आजपर्यंत, मौजे सुलिभंजन ता.खुलताबाद येथील, १. आपल्या निवासी शाळेमध्ये एकुण किती वर्ग चालतात त्यामध्ये एकुण मुलांची संख्या एकुण शिक्षक, कायम शिक्षक व तात्पुरते शिक्षक किती त्यांचे पगार किती नावासह माहिती देण्यात यावे, २. निवासी शाळेमध्ये जे विद्यार्थी आहे त्यांचे जेवन दिवसाच्या किती वेळा व जेवनामध्ये दररोज काय मेनु देण्यात येतो, जेवनाची तपासणी किती वेळेस झाली, साफ सफाई बाबत सर्व माहिती लेखी स्वरुपात देण्यात यावी, ३. आपली शाळा अनुदानित आहे किंवा विना अनुदानित आहे, अनुदानित असेल तर कधी पासुन व शासन मान्यता कधी पासुन आहे इत्यादी माहिती देण्यात यावी, ४. प्रत्येक विद्यार्थीकडुन प्रती वर्षी ट्युशन फीस किती घेतात त्याबाबत माहिती देण्यात यावी,

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जातील मागणीनुसार माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

अल इरफान माध्यमिक व उच्च माध्यमिक स्कुल, सुलिभंजन या शाळेचे विधीज्ञ यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी अल इरफान माध्यमिक व उच्च माध्यमिक स्कुल या शाळेकडे माहिती अधिकारातंर्गत माहिती अर्ज सादर करुन माहितीची मागणी केलेली आहे. तथापि या शाळेस शासनाचे कोणतेही अनुदान प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष स्वरुपात प्राप्त होत नसल्यामुळे सदर शाळेस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नाहीत आणि सदर शाळेस माहिती अधिकारातंर्गत माहिती उपलब्ध करुन देणे बंधनकारक असणार नाही. त्यामुळे अर्जदार यांनी माहिती अधिकारातंर्गत मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली

नाही. सदर शाळेस शासनाकडुन अनुदान प्राप्त होत नसल्याबाबतची बाब विचारात घेऊन अर्जदाराचे आज रोजी आयोगासमोर विचाराधिन असलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्यामुळे अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान उत्तरवादी शाळेचे विधीज्ञ यांनी आयोगासमक्ष केलेला युक्तिवाद विचारात घेता, अपिलार्थी यांनी ज्या शाळेकडे माहिती अधिकारातंर्गत माहितीची मागणी केलेली आहे त्या शाळेस शासनाचे कोणतेही अनुदान प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष स्वरुपात प्राप्त होत नाही. त्यामुळे अशा प्रकारच्या खाजगी शाळेचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (ज) मधील सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होणार नाही आणि पर्यायाने अशा प्रकारच्या खाजगी शाळेस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नाहीत. आज रोजी सुनावणीदरम्यान संबंधित शाळेच्या विधिज्ञांनी आयोगासमक्ष केलेल्या युक्तिवादाच्या पार्श्वभूमिवर नैसर्गिक न्याय तत्वास अनुसरुन अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याची व संयुक्तिक कागदपत्र सादर करण्याची संधी देण्यात आलेली आहे. मात्र अपिलार्थी यांच्या माहिती अर्जात नमूद शाळेस शासनाचे कोणतेही अनुदान प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष स्वरुपात प्राप्त असल्याबाबत अपिलार्थी आयोगास काहीही सांगू शकलेले नाहीत वा तशी कोणतीही संयुक्तिक कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर करु शकलेली नाहीत.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील निकाली काढयात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5132 दिनांक : 5/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४८९५/२०२५
बोर्ड क्र.२६

श्री.नवले अनुरथ ज्ञानदेव,
रा.पाली, ता.जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यालय अधीक्षक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, शासकीय तंत्रनिकेतन जवळ,
पत्रपेटी क्र.५१६, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, शासकीय तंत्रनिकेतन जवळ,
पत्रपेटी क्र.५१६, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२९.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व अपिलार्थी यांचे प्रतिनिधी (विधिज्ञ), जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, श्री.के.एल.चव्हाण, प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक, डॉ.किरण बा. लाढाणे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
१४.०८.२०२५	मी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्युट ऑफ पॉलिटेक्निक, बीड 431122 (महाराष्ट्र) DTE CODE 2182, MSBTE CODE 1158, AICTE PERMANENT ID 1-2077879819 या कॉलेजमध्ये दिनांक 02.07.2012 पासुन ते आजपर्यंत नियमितपणे सेवक (शिपाई) या पदावर कार्यरत आहे, तरी खालील कागदपत्र द्यावेत, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्युट ऑफ पॉलिटेक्निक, बीड चालु करताना दिलेले नियम व अटी मधील मुद्दा क्र.४ चे सदरील संस्थेने उल्लंघन केले असल्यामुळे वरिष्ट कार्यालयाने सदरील संस्थेवर केलेल्या कार्यवाहीचे दस्ताऐवज साक्षांकित करुन मिळावेत,

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याऐवजी माहिती उपलब्ध

नसल्याचे कळविलेले आहे. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जातील मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.२६.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्याचे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जात नमूद बाबीसंदर्भात संबंधित महाविद्यालयाने तसा अनुपालन अहवाल अथवा खुलासा सादर केला नसल्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवलेला नाही. दरम्यानच्या कालावधीमध्ये सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांच्या दि.१०.०९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, संस्था सुरु करताना शासनाने दिलेल्या अटी व शर्तींचे पालन न केल्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा खुलासा / अनुपालन अहवाल सादर करण्याचे संबंधित प्राचार्य, यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्युट ऑफ पॉलिटेक्निक महाविद्यालय, बीड यांना कळविलेले आहे. तथापि या संदर्भात संबंधित महाविद्यालयाने तसा पुर्तता अहवाल अद्याप कार्यालयाकडे सादर केलेला नाही. म्हणून अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नाही अथवा सदर मागणी केलेली माहिती निरंक आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेऊन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०९.१०.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेऊन प्रथम अपील निकाली काढण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यात यावी, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन माहिती नसल्याचे अपिलार्थीस कळविले असल्याचे दिसुन येत आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार ज्यावेळी माहितीचा अर्ज प्राप्त होतो त्यावेळी जी माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे ती त्याच स्वरुपात उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. माहिती तयार करुन देणे, माहितीचे संस्करण करुन देणे, प्रश्नार्थक माहिती देणे, एखादी कार्यवाही करुन माहिती देणे, एखाद्या कार्यवाहीमागील कारण / खुलासा देणे, भविष्यात माहिती प्राप्त होईल म्हणून माहितीचा अर्ज प्रलंबित ठेवणे, या प्रक्रियेंचा अथवा या स्वरुपातील माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद आणि अधिनियमातील तरतुदी यांचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०९.१०.२०२५ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२६.०८.२०२५ रोजीच्या पत्राव्दारे कळविलेल्या वस्तुस्थितीबाबत (माहिती उपलब्ध नाही) अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्या संदर्भात पाठपुरावा करणे देखील संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. S272 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २७०६ ते २७१९/२०२५ (१४)
बोर्ड क्र.२७ ते ४०

श्री.मनोहर उत्तम उमाप,
रा.सालेगाव, ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, सालेगाव,
ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — . : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२७.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये १४ द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांनां त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्रीमती एस.बी.राऊत व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.एस.डी.चव्हाण उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या १४ जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
२७	२६.०१.२०२५	दि.०१.०१.२०२० ते माहिती मिळेपर्यंत, ग्रामपंचायत कार्यालयाचे पाणी पुरवठा खातेचे, १४ वित्त आयोग खातेचे, १५ वित्त आयोग खातेचे दलित वस्ती योजनेच्या खातेचे, ग्राम निधी खात्याची व वरील खात्याची स्टेटमेंटची माहिती सत्यप्रती मिळणेबाबत,
२८	२६.०१.२०२५	दि.०१.०१.२०२० ते माहिती मिळेपर्यंत, ग्रामपंचायतच्या वतीने वरील कालावधीमधील तारखेपर्यंत ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात इमारती व रस्ते बांधकाम वाहनतळ वनीकरण अन्य पूर्ण झालेली चालू असलेली व अर्धवटत असलेल्या सर्व विकास कामाची माहिती योजनेचे नाव कामाचे नाव प्रशासकीय मान्यता तांत्रिक मंजुरी स्थान निश्चिती सातबारा आठ अ नमुना नंबर २६ चा उतारा निधीची उपलब्धता विकास कामाचे खर्च अंदाजपत्रक तयार करण्यापूर्वी सक्षम अभियंत्याकडुन जागेचे पाहणी केल्याचा अहवाल कामाचा आराखडा व ड्रॉइंग बांधकाम साहित्या नमुन्याचा गुणवत्ता परीक्षणावर कार्यारंभ आदेश पत्र क्रमांक व दिनांक इत्यादी माहिती सत्यप्रती मिळणेबाबत,
२९	२६.०१.२०२५	दि.०१.०१.२०२० ते माहिती मिळेपर्यंत, ग्रामपंचायत कार्यालयातंर्गत दलित वस्ती

		स्मशानभुमी रोड, दलित वस्ती वालकंपाउंड व ओपन वस्तीसाठी स्मशानभुमी रोडचे किती कामे करण्यात आलेली आहे त्या कामाचे इस्टिमेट, प्रशासकीय मान्यता, एमबी संबंधित गुत्तेदाराला अदा केल्या रकमेची माहिती,
३०	२६.०१.२०२५	दि.०१.०१.२०२० ते माहिती मिळेपर्यंत, ग्रामपंचायतचे वार्षिक उत्पन्नचा ग्रामपंचायतकडे नोंदीत आकडा नोंदविलेली माहिती मागासवर्गीय वस्ती विकास व सुधारणा करिता त्यातील १५ टक्के रक्कम कोणकोणत्या कामावर खर्च झाली त्या प्रत्येक कामाची विकास काम उपक्रमाची योग्य त्या नोंदवहीतील नोंदीत माहिती मागासवर्गीय वस्ती विकास कामावर कराचा खर्च अनुशेषित असल्यास तसा नोंदीत असलेली एकुण अनुशोषित रकमेची नोंदवहीतील आकड्याची माहिती सत्यप्रती मिळणेबाबत,
३१	२६.०१.२०२५	दि.०१.०१.२०२० ते माहिती मिळेपर्यंत, १. ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील मजुराचे नाव जॉब कार्ड मागणी अर्ज व दिनांक जॉब कार्ड मजुराकडे सुपुर्त केल्याचा दिनांक इत्यादी नोंदी असलेल्या सर्व जॉब कार्ड धारकांचा तपशिल असलेल्या नोंदवहीची माहिती मनरेगा अंतर्गत सेल्फ वरील कामाची नोंद असणाऱ्या नोंदवहीच्या संपूर्ण नोंदीची माहिती सत्यप्रत मिळणे, २. मनेरगा अंतर्गत ग्रामपंचायत पातळीवर सुरु असलेल्या कामांचा तपशिल असलेल्या नोंदीच्या माहिती मनरेगा अंतर्गत पूर्ण झालेली काम सुरु असलेले काम व मंजूर असलेली कामे यांच्या प्रकरण निहाय ठेवण्यात आलेल्या वर्क फाईल व नस्तीच्या माहिती सत्यप्रती मिळणेबाबत,
३२	२६.०१.२०२५	दि.०१.०१.२०२० ते माहिती मिळेपर्यंत, १. ग्रामपंचायत वतीने वैयक्तिक लाभांच्या योजनेच्या लाभधारक व्यक्तीची नावे व त्यांना मिळालेल्या लाभ यांची नोंदवलेली माहिती स्वच्छता बांधकाम अनुदान इंदिरा व रमाई आणि तत्सम घरकुल योजना लाभार्थी शेती अवजारे वाटप लाभार्थी सौर ऊर्जा बंब गॅस शेगडी व गॅस जोडणी इत्यादी अनुदान व मोफत वितरण योजना लाभार्थी यांची योजनेची लाभ घेतल्याची नोंद व लाभ मिळाल्याची योग्य त्या नोंदवहीत लाभार्थ्यांची घेतलेली स्वाक्षरी अंगठा याची माहिती सत्यप्रती मिळणेबाबत, २. ग्रामपंचायतच्या वतीने वैयक्तिक लाभाच्या योजनेचे जे लाभार्थी निवडले त्यांचे ग्रामसभेत झालेली निवड व निवडीस मान्यता देण्यासाठी झालेल्या वैयक्तिक लाभांच्या सर्व ठरावाची माहिती व त्या ग्रामसभेचे उपस्थित असणाऱ्या सर्व ग्रामस्थांच्या उपस्थिती स्वाक्षरी नोंदवहीच्या माहिती सत्यप्रती मिळणेबाबत.
३३	२६.०१.२०२५	दि.०१.०१.२०२० ते माहिती मिळेपर्यंत, सर्व लेखापरीक्षण अहवाल त्या त्या प्रत्येक वर्षामध्ये ग्रामसभेत सादर केले असल्याच्या ग्रामसभेच्या ठराव व इतिवृत्ताची माहिती लेखा परीक्षण सादर केलेल्या ग्रामसभेत उपस्थित असणाऱ्या सर्व ग्रामस्थांची उपस्थिती स्वाक्षरी अंगठा असलेल्या ग्रामसभा उपस्थिती रजिस्टर ची माहिती सत्यप्रती मिळणेबाबत,
३४	२६.०१.२०२५	दि.०१.०१.२०२० ते माहिती मिळेपर्यंत, वार्षिक लेखा विवरणे / लेखापरीक्षण अहवाल मागील तीन वर्षातील माहिती लेखापरीक्षण अहवालावर लेखा परीक्षकांनी दिलेली टिपणी, वित्तीय काढलेले त्रुटी व त्यास ग्रामपंचायतीने दिलेले उत्तर, केलेली सुधारणा या संदर्भातील सर्व कागदपत्रांची माहिती सत्यप्रती मिळणेबाबत,
३५	२६.०१.२०२५	दि.०१.०१.२०२० ते माहिती मिळेपर्यंत, ग्रामपंचायत कार्यालयाने सरपंच ग्रामसेवक यांनी आतापर्यंत एकुण किती चेक काढलेले आहेत, त्या चेकची व चेक नंबरची माहिती तसेच गुत्तेदाराला अदा केलेल्या रकमेची माहिती सत्यप्रती,
३६	२६.०१.२०२५	दि.०१.०१.२०२० ते माहिती मिळेपर्यंत, १. इंदिरा आवास मंजुर घरकुले, पूर्ण घरकुले, अपूर्ण घरकुल, सुरु असलेले घरकुले, सुरु नसलेले घरकुले अशा योग्य त्या नोंदवहीत नोंदविलेल्या नोंदीची माहिती, २. पीएमवाय (ग्रामीण) मंजूर घरकुले, पूर्ण घरकुले, अपूर्ण घरकुले, सुरु असलेले घरकुले, सुरु नसलेले घरकुले अशा योग्य त्या नोंदवहीत नोंदवलेल्या नोंदीची माहिती,

३७	२६.०१.२०२५	दि.०१.०१.२०२० ते माहिती मिळेपर्यंत, नमुना नंबर ८ कर आकारणी नोंदवही रजिस्टरची माहिती, नमुना नंबर ९ कर मागणी नोंदवही रजिस्टरची माहिती, नमुना नंबर ९ कराची मागणी पावती पुस्तिकेची माहिती नमुना नंबर १० कर व फी बाबत पावती पुस्तकाची माहिती,
३८	२६.०१.२०२५	दि.०१.०१.२०२० ते माहिती मिळेपर्यंत, १. ग्रामपंचायत झालेल्या सर्व मासिक सभांचा नोंदविलेला तपशिल व इतिवृत्त मिनिट्स व सर्व ठराव ची माहिती मासिक सभांमध्ये महिन्याच्या जमाखर्चास मान्यता दिलेल्या नोंद व स्वाक्षऱ्याची माहिती, २. ग्रामपंचायतच्या संपन्न झालेल्या सर्व मासिक सभा ठिकाण दिनांक वेळ व सदस्य उपस्थिती असा सर्व नोंदविलेल्या नोंदवहीची माहिती,
३९	२६.०१.२०२५	दि.०१.०१.२०२० ते माहिती मिळेपर्यंत, नमुना नंबर ८ कर आकारणी नोंदवही रजिस्टरची माहिती, नमुना नंबर ९ कर मागणी नोंदवही रजिस्टरची माहिती नमुना नंबर ९ कराची मागणी पावती पुस्तिकेची माहिती नमुना नंबर १० कर व फी बाबत पावती पुस्तकाची माहिती,
४०	२६.०१.२०२५	दि.०१.०१.२०२० ते माहिती मिळेपर्यंत, वर्ष सन २०२२ ते २०२४ चे ग्रामपंचायतचे वार्षिक अंदाजपत्रकाची माहिती अंदाजपत्रक ग्रामसभेत सादर करुन मान्यता घेतलेल्या ग्रामसभेच्या ठरावाची माहिती व सदर ग्रामसभेत उपस्थित सदस्यांच्या त्यांच्या सहीनिशी असलेल्या उपस्थिती रजिस्टरची माहिती अंदाजपत्रक पंचायत समितीकडे सादर केल्याचा दिनांक व घेतलेली पोहोच यांची ग्रामपंचायतकडे नोंदवून ठेवलेल्या नोंदीची माहिती,

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या सर्व माहिती अर्जामध्ये माहिती व्यक्तिश: हवी असल्याचे नमूद केलेले आहे. तथापि व्यक्तिश: माहितीची मागणी करुन ते माहिती घेण्याकरिता कार्यालयात व्यक्तिश: उपस्थित राहिलेले नाहीत. अपिलार्थी यांनी त्यांच्या सर्व १४ माहिती अर्जांव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. त्यामुळे अपिलार्थी यांच्या सर्व माहिती अर्जास दि.१९.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये एकत्रित प्रतिसाद देऊन, माहितीचे अवलोकन करण्याकरिता दि.२१.०२.२०२५ रोजी कार्यालयात उपस्थित राहणेबाबत अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाव्दारे सुचित करण्यात आलेले आहे. तथापि अपिलार्थी यांना सूचित केल्याप्रमाणे ते अवलोकनाकरिता कार्यालयात उपस्थित राहिले नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. या संदर्भात अपिलार्थी यांच्या अनुपस्थितीचा पंचासमक्ष पंचनामा करण्यात आलेला आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलांवर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२१.०३.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, अपिलार्थीस अवलोकनाकरिता पुन:श्च संधी देऊन अवलोकनाअंती ५० पृष्ठांची माहिती विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन दि.२७.०९.२०२५ रोजी कार्यालयात उपस्थित राहुन माहितीचे अवलोकन करणेबाबत अपिलार्थी यांना सूचित करण्यात आलेले आहे. तथापि अपिलार्थी यांना सूचित केल्याप्रमाणे ते माहितीचे अवलोकन करण्याकरिता कार्यालयात उपस्थित राहिले नसल्यामुळे तसा पंचासमक्ष पंचनामा करण्यात आलेला आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जांव्दारे मागणी केलेली सर्व माहिती कार्यालयात उपलब्ध असुन या संदर्भात आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या सर्व प्रथम अपिलांवर दि.२१.०३.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे माहितीचे अवलोकन करणेबाबत अपिलार्थीस पुन:श्च एक संधी देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना निर्देशित करण्यात आलेले आहे. अत: अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी माहिती उपलब्ध करुन देतील, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अवलोकनाकरिता सूचित केलेले पत्र उशिराने प्राप्त झालेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि.१९.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन दि.२१.०२.२०२५ रोजी कार्यालयात उपस्थित राहणेबाबत कळविलेले आहे. वास्तविक असे पत्र त्यांनी किमान आठ दिवस अगोदर निर्गमित करणे आवश्यक होते. वास्तविक अर्जदार यांचे निवासस्थान ग्रामपंचायत कार्यालयाला लागून आहे. जन माहिती अधिकारी

असे पत्र अर्जदारास घरपोच देखील देऊ शकले असते. मात्र असे पत्र अपिलार्थीस मिळूच नये, अशी जन माहिती अधिकारी यांची भूमिका आहे. जन माहिती अधिकारी मागील किती तरी दिवसापासुन ग्रामपंचायत कार्यालयात हजर नाहीत. ते ग्रामसभा देखील घेत नाहीत. अर्जदार सद्यस्थितीत ग्रामपंचायतीचे विद्यमान सभासद आहेत. विद्यमान सभासद असताना देखील माहिती मिळत नाही. ग्रामपंचायत कार्यालयातील बहुतांश कामे ही कागदपत्रीच झालेली आहेत. प्रत्यक्षात अशी कामे झालेली नाहीत. म्हणून माहिती अधिकारातंर्गत माहितीची मागणी केलेली आहे. सदर माहिती मिळाल्यास सत्यतेबाबतची शहानिशा करता येणे शक्य होईल. म्हणून मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी आदेशित केले, परंतु जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाचे पालन केले नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन माहितीचे अवलोकन करणेबाबत अपिलार्थीस सुचित केले असल्याचे दिसुन येत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी सुचित केलेले पत्र मुदतीत प्राप्त झाले नसल्याचे अपिलार्थी यांनी आज रोजी सुनावणीदरम्यान अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

<u>आदेश</u>

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, सालेगाव, ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना असे अवलोकन प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं) यांचे उपस्थितीत द्यावे. त्यानुसार अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ व महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (दुसरी सुधारणा) २०१२ नुसार माहितीचे असे अवलोकन अपिलार्थी यांना व्यक्तिश: अनुज्ञेय राहील. प्रतिनिधीस अनुज्ञेय असणार नाही. अपिलार्थी यांना अवलोकनाकरिता सुचित केलेल्या दिनांकास अपिलार्थी अवलोकनाकरिता उपस्थित न राहिल्यास त्यांना माहितीची आवश्यकता नाही, असे गृहित धरुन माहिती अर्ज निकाली काढण्यात यावेत.

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह १४ व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.5273 दिनांक :12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
गट विकास अधिकारी,. पंचायत समिती, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ९२८/२०२५
बोर्ड क्र.४१

श्री.अशोक विश्वनाथ नवघरे, अपिलार्थी
रा.सिंचन नगर, परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
सहायक महसूल अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी.तथा : उत्तरवादी क्र.२
नायब तहसिलदार,
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०४.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा सहायक महसूल अधिकारी, श्रीमती योगिता रामेश्वर बदर उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
०७.१०.२०२४	राज्य माहिती आयोग खंडपीठ संभाजीनगर यांनी जा.क्र./पी/१३७७९, दि.०७.०८.२०२४ बद्दल खालील मुद्देनिहाय माहिती, १. सदर आदेशान्वये नायब तहसिलदार यांनी अंमलबजावणी बद्दल केलेली कार्यवाहीची माहिती, २. जिल्हाधिकारी यांनी आयोगाने आदेशित केल्याप्रमाणे दि.०१.१२.२०१५ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार केलेली कार्यवाहीची माहिती,

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.१५.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देण्यात येऊन, अपिलार्थी यांनी मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली १४ पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीशिवाय दुसरी कोणतीही माहिती अभिलेखात उपलब्ध नाही. अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपिलार्थी यांचे आज रोजी विचाराधिन असलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, चुकीची व

दिशाभूल करणारे पत्र पाठविले, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार ज्यावेळी माहितीचा अर्ज प्राप्त होतो त्यावेळी जी माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे ती त्याच स्वरुपात उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. माहिती तयार करुन देणे, माहितीचे संस्करण करुन देणे, प्रश्नार्थक माहिती देणे, एखादी कार्यवाही करुन माहिती देणे, एखाद्या कार्यवाहीमागील कारण / खुलासा देणे, भविष्यात माहिती प्राप्त होईल म्हणून माहितीचा अर्ज प्रलंबित ठेवणे, या प्रक्रियेंचा अथवा या स्वरुपातील माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्या संदर्भात पाठपुरावा करणे देखील संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5274 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १४३५/२०२५
बोर्ड क्र.४२

श्री.संदिप आप्पाराव निळकंठे, अपिलार्थी
रा.घर नंबर ६४४, दिगलंजमाता मंदिराजवळ, दत्तधाम परिसर,
वसमत रोड, परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
सहायक महसूल अधिकारी,
आस्थापना-०४, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
नायब तहसिलदार,
आस्थापना विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

.अपिलार्थी यांनी दि.०९.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा सहायक महसूल अधिकारी, श्री.विठ्ठल अशोकराव मोरे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा नायब तहसिलदार (आस्थापना), श्री.प्रशांत पंडितराव वाकोडकर उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
दि.०२.०२.२०२५ ऑनलाईन	---अधिकारी या पदावर पदोन्नतीचा सेवा जेष्ठता दिनांक कोणत्या शासन निर्णय अधिसुचना नियम अधिनियम याच्या आधारे ठरविला तो संदर्भीय शासन निर्णय, अधिसुचना, नियम, अधिनियम याची माहिती, श्री.परळीकर चंद्रकांत केशवराव यांची तलाठी या पदावरील अंतर जिल्हा बदली आदेश याची माहिती---

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी कार्यालयाकडे काही माहिती अर्ज सादर केलेले आहेत. सर्व माहिती अर्जाच्या अनुषंगाने वेळोवळी प्रतिसाद देऊन उपलब्ध माहिती अपिलार्थी यांना प्रदान करण्यात आलेले आहे. प्रस्तुत प्रकरणातील माहिती अर्जानुसार अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती देखील अपिलार्थीस देण्यात आलेली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरयान अवगत केले की, अपिलार्थी यांनी कार्यालयाकडे सादर केलेल्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मागितलेली माहिती न पुरविल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी

त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या पटलावर सादर केलेली कागदपत्र प्रस्तुत प्रकरणातील माहिती अर्जाशी सुसंगत असल्याचे दिसुन येत नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांचा माहिती अर्ज दि.०२.०२.२०२५ रोजीचा असुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिल्याबाबतचे दि.१६.०४.२०२४ रोजीचे पत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेले आहे. आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांनी व्दितीय अपील आयोगाकडे सादर करताना नमूद केलेले प्रयोजन विचारात घेता, त्यांना या प्रकरणी माहिती प्राप्त झाली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहायक महसूल अधिकारी, आस्थापना-४, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. नायब तहसिलदार, आस्थापना विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5275 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १७९८/२०२५
बोर्ड क्र.४३

श्री.सय्यद जावेद सय्यद जिलानी,
रा.शाहा ईनायत मोहल्ला, परभणी — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
नगर परिषद प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा सह आयुक्त,
नगर पालिका प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०६.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.उमेश आर्दड, कर व प्रशासकीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
दि.३१.१२.२०२४	दलितेत्तर योजना किंवा नागरी दलित वस्ती सुधारणा योजना अंतर्गत परभणी शहर महानगरपालिका परभणी यांनी वर्ष २०२३ ते २०२४ पर्यंत जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांचेकडे निधीच्या उपलब्धतेसाठी प्रस्ताव किती सादर केले त्याची संपूर्ण माहिती देणे व प्रस्तावाची प्रमाणित प्रत देणे व प्रस्तावासोबत सादर केलेल्या प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत व या योजनेतंर्गत वितरित करण्यात आलेल्या निधीची पूर्ण माहिती,

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाबाबत काहीही कळविलेले नाही. माहिती अर्जानुसार मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती परभणी शहर महानगरपालिका, परभणी या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) नुसार परभणी शहर महानगरपालिका, परभणी यांचेकडे हस्तांतरित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली

नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमक्ष केलेला युक्तिवाद विचारात घेता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती दुसऱ्या कार्यालयाशी संबंधित असल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती दुसऱ्या कार्यालयाशी / प्राधिकरणाशी संबंधित असल्यास अशा माहितीकरिता अपिलार्थी यांचा माहिती अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) नुसार जास्तीत जास्त पाच दिवसात माहितीशी संबंधित कार्यालयाकडे / प्राधिकरणाकडे हस्तांतरित करणे आवश्यक आहे. मात्र या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे कलम ६ (३) नुसार मुदतीत हस्तांतरण झाले असल्याचे दिसुन येत नाही. म्हणून अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आता अधिनियमातील कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार माहितीशी संबंधित कार्यालयाकडुन एकत्रित / संकलित करुन अपिलार्थीस द्यावी लागेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, नगर पालिका प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोड़पत्र अ मध्ये नमूद असलेली माहिती ज्या कार्यालयाशी / प्राधिकरणाशी संबंधित आहे ती त्या कार्यालयाकडुन / प्राधिकरणाकडुन (परभणी शहर महानगरपालिका, परभणी) अधिनियमातील कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार एकत्रित / संकलित करुन अशी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. जिल्हा सह आयुक्त, नगर पालिका प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-5276 दिनांक :-12/5/2026-नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५००४/२०२५
बोर्ड क्र.४४

श्री.सय्यद जावेद सय्यद जिलानी, अपिलार्थी
रा.शाहा ईनायत मोहल्ला, परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी, : उत्तरवादी क्र.२
जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०४.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
१९.०६.२०२५	जिल्हा नियोजन समिती निधी अंतर्गत नागरी दलितेत्तर विकास योजना निधी / ३५७७ अंतर्गत प्रभाग क्र.०८ मध्ये ए१ ग्लस ते झाकीर भाई फ्रीज ते शाह इनायत मोहल्ला, मोमीनपुरा या परिसर मध्ये गट्टु रोड व सी.सी. ड्रोन काम पूर्ण झाले आहे, कामावर झालेला खर्च किती आहे, शिल्लक / बचत रक्कम आपल्या कार्यालयात जमा करण्यात आली का नाही याची सविस्तर माहिती देणे व काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्राच्या प्रमाणित प्रती देणे,

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती व प्रथम अपील अर्जाची दखल घेतली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या

मुदतीत कार्यवाही केलेली नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार मुदतीत सुसंगत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह दि.१०.०६.२०२६ रोजी वेळ सकाळी ११.०० वा. आयोगासमोर व्यक्तिशः उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१७.०७.२०२५ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5548 दिनांक : 19/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २३५१/२०२५
बोर्ड क्र.४५

श्री.कदम गिरीश विठ्ठलराव, — अपिलार्थी
रा.गणपती मंदीर जवळ, पूर्णा, ता.पूर्णा, जि.परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहायक महसूल अधिकारी,
निवडणूक विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
नायब तहसिलदार (निवडणूक),
जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१६.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा सहायक महसूल अधिकारी, श्री.दत्ता मारोतराव गिनगिने व प्रथम अपिलीय अधिकारी तथा नायब तहसिलदार (निवडणूक), श्री.सतिष जनार्धन रेड्डी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
०३.०२.२०२५	मा.जिल्हाधिकारी परभणी श्री.रघुनाथ गावडे यांनी सा.बां. विभागाचे कार्यकारी अभियंता एस.एस.पाटील यांना दिलेल्या नोटीस बाबत मांहितीच्या सत्यप्रती, दि.०१.१०.२०२४ ते आजपर्यंत,

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जात नमूद केलेल्या विषयासंदर्भात कार्यालयीन अभिलेखाची शहानिशा केली असता, कोणतीही नोटीस निर्गमित करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.२८.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देण्यात येऊन, माहिती अर्जात नमूद श्री.एस.एस.पाटील, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना कोणतीही नोटीस निर्गमित झालेली नाही, असे अपिलार्थीस अवगत करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती अर्जातील शासनहिताची व निवडणूक पारदर्शकतापणाची माहिती लपविली जाते, दिली जात नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन माहिती / माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती

अपिलार्थीस कळविली असल्याचे दिसुन येत आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार ज्यावेळी माहितीचा अर्ज प्राप्त होतो त्यावेळी जी माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे ती त्याच स्वरुपात उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. माहिती तयार करुन देणे, माहितीचे संस्करण करुन देणे, प्रश्नार्थक माहिती देणे, एखादी कार्यवाही करुन माहिती देणे, एखाद्या कार्यवाहीमागील कारण / खुलासा देणे, भविष्यात माहिती प्राप्त होईल म्हणून माहितीचा अर्ज प्रलंबित ठेवणे, या प्रक्रियेंचा अथवा या स्वरुपातील माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्या संदर्भात पाठपुरावा करणे देखील संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-5277 दिनांक :-12/5/2026-नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४१६५/२०२५
बोर्ड क्र.४६

श्री.कदम गिरीश विठ्ठलराव, अपिलार्थी
रा.गणपती मंदीर जवळ, पूर्णा, ता.पूर्णा, जि.परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
सहायक महसूल अधिकारी,
गृह शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
नायब तहसिलदार,
गृह विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१५.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा सहायक महसूल अधिकारी, श्री.शरद पं.मगर उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
०१.०४.२०२५	तालुका दंडाधिकारी पूर्णा यांचे दि.०५.१०.२०२४ चे पत्राचे चौकशी अहवाल

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जात नमूद केलेल्या विषयासंदर्भात कार्यालयीन अभिलेखाची शहानिशा केली असता, नमूद अभिलेख आढळुन आलेला नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.२८.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देण्यात येऊन, माहिती अर्जात नमूद माहितीचे अनुषंगाने संकलनातील उपलब्ध अभिलेखाचा शोध घेतला असता मागणी केलेल्या माहितीचे अभिलेख आढळुन आलेले नाहीत, असे अपिलार्थीस अवगत करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, दिशाभूल करणारे उत्तर दिले आहे, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन माहिती / माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थीस कळविली असल्याचे दिसुन येत आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार ज्यावेळी माहितीचा अर्ज प्राप्त होतो त्यावेळी जी माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे ती त्याच स्वरुपात उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. माहिती तयार करुन देणे, माहितीचे संस्करण करुन देणे, प्रश्नार्थक माहिती देणे, एखादी

कार्यवाही करुन माहिती देणे, एखाद्या कार्यवाहीमागील कारण / खुलासा देणे, भविष्यात माहिती प्राप्त होईल म्हणून माहितीचा अर्ज प्रलंबित ठेवणे, या प्रक्रियेंचा अथवा या स्वरुपातील माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्या संदर्भात पाठपुरावा करणे देखील संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5278 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २८९८/२०२५
बोर्ड क्र.४७

पँथर प्रकाश बनसोडे, अपिलार्थी
अध्यक्ष भारतीय दलित पँथर, पँथर मुख्यालय, उंटखाना चौक,
डॉ.भदन्त आनंद, कौसल्यायन मार्ग, नागपूर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
सहायक महसूल अधिकारी,
गृह शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
नायब तहसिलदार,
गृह विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१०.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा सहायक महसूल अधिकारी, श्री.शरद पं.मगर, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.गणेश पोलास, नायब तहसिलदार (करमणूक कर) उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांनी त्यांचे दि.०२.०४.२०२६ रोजीचे (प्राप्त दि.०६.०४.२०२६) लेखी निवेदन आयोगाच्या पटलावर सादर केलेले आहे. या निवेदनामध्ये अपिलार्थी यांनी, ते दि.०८.०४.२०२६ रोजीच्या सुनावणीस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहु शकते नसल्याचे, माहिती पुरविली नसल्याचे व माहितीपासुन वंचित ठेवल्याचे नमूद करुन माहिती पुरविण्यात यावी, अशी विनंती केलेली आहे.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
२०.१२.२०२४	परभणी येथील युवक मयत सोमनाथ व्यंकट सुर्यवंशी यांचे नुकतेच झालेले मृत्यू प्रकरणी महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती जमाती आयोग, मुंबई यांनी दि.१३.१२.२०२४ दरम्यान अहवाल मागितल्याचे प्रसिध्द झाले आहे, या प्रकरणी जिल्हा दंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी, परभणी यांचेकडुन महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती जमाती आयोग, मुंबई यांना पाठविण्यात आलेल्या अहवालाची साक्षांकित सत्यप्रत पुरविण्यात यावी,

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.२०.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देण्यात येऊन, दि.१५.०१.२०२५ रोजी परभणी येथील हिंसाचार प्रकरणाची तसेच स्व.श्री.सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी करण्यासाठी न्यायालयीन चौकशी समिती गठीत केली असल्याचे, सदर समिती गठीत करण्यात आलेल्या शासन निर्णयाची प्रत या पत्रासोबत उपलब्ध करुन

देण्यात येत असल्याचे अपिलार्थीस कळवून समितीचा अहवाल शासनाने विधान मंडळाच्या पटलावर ठेवल्यानंतर त्याबाबतच्या माहितीची मागणी करणेबाबत देखील अपिलार्थीस सुचित करण्यात आलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि.२४.०४.२०२५ रोजी सुनावणी घेऊन आदेश पारित करुन माहिती पुरविली नाही, माहितीपासुन वंचित ठेवले, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन माहिती / माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थीस कळविली असल्याचे दिसुन येत आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार ज्यावेळी माहितीचा अर्ज प्राप्त होतो त्यावेळी जी माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे ती त्याच स्वरुपात उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. माहिती तयार करुन देणे, माहितीचे संस्करण करुन देणे, प्रश्नार्थक माहिती देणे, एखादी कार्यवाही करुन माहिती देणे, एखाद्या कार्यवाहीमागील कारण / खुलासा देणे, भविष्यात माहिती प्राप्त होईल म्हणून माहितीचा अर्ज प्रलंबित ठेवणे, या प्रक्रियेंचा अथवा या स्वरुपातील माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात दिलेल्या प्रतिसादामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5279 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २८९९/२०२५
बोर्ड क्र.४८

श्री.अशोक लक्ष्मणराव कदम, — अपिलार्थी
रा.श्रीराम कॉलनी, मिनाक्षी टॉकिज समोर, सेलु, जि.परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
सहायक महसूल अधिकारी,
भूसंपादन विभाग (समन्वय), जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
नायब तहसिलदार,
भूसंपादन विभाग (समन्वय), जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१०.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा सहायक महसूल अधिकारी, श्रीमती आसीया शेख, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.गणेश पोलास, नायब तहसिलदार (करमणूक कर) उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
०५.०५.२०२५	तत्का.जिल्हाधिकारी श्रीम.आंचल गोयल यांनी मा.प्रधान सचिव कृषि मंत्रालय मुंबई यांना लिहिलेल्या पत्र जाक्र.२०२३/साप्र/भुसं/(स) कावि ०१ दि.१५.०६.२०२३ नुसार अशोक लक्ष्मणराव कदम हे फळझाड मुल्यांकन मध्ये आढळुन आलेल्या गंभीर बाबी व अनियमिततेबाबतचे कागदपत्रे व नस्ती,

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, शासकीय कामकाज पार पाडत असताना पार पाडलेल्या कामातील गंभीर बाबी व अनियमिततेबाबत खोटा अहवाल शासनास कळवून कारवाई करण्यात आलेली आहे. याबाबत स्वत:वर झालेला अन्यायाविरुध्द सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागण्याकरिता माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. जन माहिती अधिकारी यांनी अद्याप कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.२३.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देण्यात येऊन, अपिलार्थी यांनी मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी सर्व माहिती अपिलार्थी यांना टपालाव्दारे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच सदर माहिती आज रोजी सोबत देखील आणलेली आहे. सदर माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे

अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. तथापि माहिती अप्राप्त असल्याचे अपिलार्थी यांनी अवगत केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती आज रोजी सोबत देखील आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार सदर माहिती अपिलार्थी यांना देण्यात आली. अपिलार्थी यांनी सदर माहिती आयोगासमक्ष स्विकारलेली आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5280 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ३४०७/२०२५
बोर्ड क्र.४९

श्री.इरशाद पाशा चाँद पाशा, — अपिलार्थी
रा.पिंपरी रोहीला, पो.दुधगाव, ता.जिंतूर, जि.परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहायक महसूल अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
नायब तहसिलदार,
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१०.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा सहायक महसूल अधिकारी, श्रीमती योगिता रामेश्वर बदर उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
२७.०३.२०२५	दि.२१.११.२०२३ रोजी कोक ते कौडगाव रस्ता बाबत मा.जिल्हाधिकारी यांच्या दालनात दि.०६.१०.२०२३ रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने बैठक आयोजित करण्यात आली होती त्या अनुषंगाने झालेल्या कार्यवाहीची माहिती द्यावी,

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली व कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती संकलित / एकत्रित करुन दि.०२.०६.२०२५ रोजीच्या पत्रासोबत अपिलार्थी यांना ११९ पृष्ठांची माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला असता, अपिलार्थी यांनी सदर माहिती स्विकारण्यास नकार दिलेला आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१६.०५.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली सर्व माहिती आता अपिलार्थी यांना आयोगासमक्ष

उपलब्ध करुन देण्याकरिता सोबत आणलेली आहे. सदर माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अद्याप माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार सदर माहिती अपिलार्थी यांना देण्यात आली. अपिलार्थी यांनी सदर माहिती आयोगासमक्ष स्विकारलेली आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5281 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २१२६/२०२५
बोर्ड क्र.५०

श्री.यशवंत विठ्ठलराव चौधरी, अपिलार्थी
रा.खडकपुरा गल्ली, गंगाखेड, ता.गंगाखेड, जि.परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
सहायक महसूल अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
नायब तहसिलदार,
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२८.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा सहायक महसूल अधिकारी, श्री.भानुदास वटाणे उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
०४.०२.२०२५	श्री.साळवे तलाठी व सोडगीर मंडळ निरीक्षक गंगाखेड यांचे तक्रार, सन २०२३ ते माहिती देईपर्यंत, स.नं.४२० चा फेर क्र.१९३१३ दि.०५.०३.२०२३ च्या बाबत, मा.तहसिलदार गंगाखेड यांचे आदेशात मालकी ताब्यातील क्षेत्र हा वस्तुस्थितीदर्शक शब्द नसताना फेर क्र.१९३१३ मध्ये हा शब्द नोंदवून प्रतिबंधित मालक नोंद नियमबाह्यरित्या काढुन टाकली, या कारणाने श्री.साळवे व श्री.सोडगीर या लोक सेवकाविरुध्द कायदेशीर कार्यवाहीची मागणी, सदर दि.१६.०५.२०२२ च्या अर्जावरील कार्यालयाच्या कार्यवाहीची माहिती व टिपणीसह संचिका,

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१७.०४.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी प्राप्त करुन दिलेल्या माहितीवर समाधानी असल्याचे प्रथम अपिलीय अधिकारी यांना अवगत केलेले आहे. अपिलार्थीस सुनावणीदरम्यान उपलब्ध करुन दिलेली माहिती व अपिलार्थी यांचा उपलब्ध करुन दिलेल्या माहितीवर ते समाधानी असल्याचा युक्तिवाद विचारात घेऊन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे प्रथम अपील प्रकरण बंद करण्यात येत असल्याचा निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, दिशाभूल

करणारी व खोटी माहिती दिली, असे कारण नमूद केलेले आहे. आज सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमक्ष केलेल्या युक्तिवादाच्या अनुषंगाने, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारित केलेल्या निर्णयाचे अवलोकन केले असता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीस प्रथम अपील सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिल्याची बाब विचारात घेऊन प्रथम अपील बंद करण्यात येत असल्याचा निर्णय पारित केला असल्याचे दिसुन येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपील सुनावणीदरम्यान माहिती उपलब्ध करुन दिल्याची बाब विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि.१७.०४.२०२५ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्या बाबत पाठपुरावा करणे देखील संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.5282 दिनांक :12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४६५७/२०२५
बोर्ड क्र.५१

श्री.यशवंत विठ्ठल चौधरी,
रा.खडकपुरा गल्ली, गंगाखेड, ता.गंगाखेड, जि.परभणी — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
महसूल सहायक
गौण खनिज विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा खनिकर्म अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१०.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक, श्री. सरवदे दिनकर चंद्रकांत व प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी, श्री.उमाजी बोथीकर उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
२६.०५.२०२५	विना परवानगी जेसीबी मशिनने डोंगर खोदून रॉयल्टी न भरता ५०० ते १००० ब्रास संगणमताने खनिज संपत्तीचा वापर केला बाबत, दि.२४.०७.२०२४ ते आजपर्यंत, मौजे गंगाखेड येथील स.नं.४२० मध्ये विना परवानगी डोंगर फोडुन सपाटीकरण केले तसेच बेकायदेशीरपणे प्लॉटींग टाकुन ओढयाचा नैसर्गिक प्रवाह बंद करुन टाकुन खनिज संपत्तीचे ५०० ते १००० ब्रास रॉयल्टी न भरता शासनाचे मोठे नुकसान केले आहे तसेच पर्यावरणास हानी निर्माण केली आहे, सोबत दि.०९.०४.२०२४ रोजीचा अर्ज,

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी नेमक्या माहितीची अथवा अभिलेखाची मागणी केलेली नाही. त्यांनी त्यांच्या माहिती अर्जात तक्रार सदृश्य माहितीचे वर्णन केलेले आहे. मात्र नेमकी कोणती माहिती हवी आहे याबाबत काहीही उल्लेख केलेला नाही. म्हणून अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.१६.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देण्यात येऊन, हव्या असलेल्या माहितीचा उल्लेख अर्जामध्ये करण्यात यावा, असे अपिलार्थीस अवगत करण्यात आलेले आहे. तसेच अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जात उल्लेख केलेल्या तक्रार अर्जासंदर्भात कार्यालयाकडुन करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत देखील अपिलार्थीस अवगत करण्यात आलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.३०.०९.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करण्यात येऊन अपिलार्थी यांचे प्रथम अपील नामंजूर करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, दिशाभूल करणारी व खोटी माहिती दिली, असे कारण नमूद केलेले आहे. आज सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन, माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5283 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५७२०/२०२५
बोर्ड क्र.५२

ॲड.यशपाल अंबादासराव कदम,
रा.जयभिम महसूल कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था, वसमत रोड, परभणी — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
महसूल सहायक,
जमीन - २, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
नायब तहसिलदार (महसूल),
जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.११.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाटीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाटी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक, श्री.ओमप्रकाश एकनाथराव काळे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल), श्री.सतीश रेड्डीउपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
दि.०८.०८.२०२५	जिल्हाधिकारी परभणी यांना दि.०५.०८.२०२५ रोजी दिलेल्या निवेदनावर ज्या व्यक्तींची नावे स्वाक्षरी सहीत आहेत त्यांना जिल्हाधिकारी परभणी यांनी महसूल कर्मचारी गृहनिर्माण संस्था (म), परभणी, वसमत रोड, परभणी या संस्थेत सभासद व प्लॉट वाटप केल्याचा दिनांकासह सदर व्यक्ती आज रोजी ज्या ठिकाणी राहतात त्याचा सविस्तर तपशिल मिळणेबाबत,

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी .अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.२६.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देण्यात येऊन, अपिलार्थी यांनी मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली १० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना देण्यात आलेली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरयान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०६.१०.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील नामंजूर करण्यात आलेले आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी दिलेली माहिती मागणी केलेल्या माहितीशी विसंगत व

असंबंधित आहे. जन माहिती अधिकारी यांनी जिल्हाधिकारी यांचे दि.०२.१०.१९७० रोजीच्या आदेशाची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. या माहितीची मागणी केलेली नसुन दि.०५.०८.२०२५ रोजीच्या निवेदनावर ज्या व्यक्तीच्या स्वाक्षऱ्या आहेत त्यांना सभासद केल्याची व प्लॉट वाटप केल्याची माहिती हवी आहे. या बाबत जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदर माहिती व्यापक जनहिताशी संबंधित आहे. त्यामुळे मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मागितलेली माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्त्विवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद दिला असल्याचे दिसुन येत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद देऊन उपलब्ध करुन दिलेली माहिती मागणी केलेल्या माहितीशी विसंगत व असंबंधित असल्याचे अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केलेले आहे. अत: अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना सत्वर व परिपूर्ण स्वरुपात प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातुन माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार तहसिलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या प्रकरणी आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5284 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,

१. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी
२. जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ३७३४/२०२५
बोर्ड क्र.५३

श्री.अमित मधुकरराव तांडे, अपिलार्थी
रा.तुलसी, कदम गल्ली, अहिल्याबाई होळकर चौक, सोनपेठ,
ता.सोनपेठ, जि.परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
सहायक महसूल अधिकारी,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाथरी, जि.परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाथरी, जि.परभणी

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०८.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा सहायक महसूल अधिकारी, श्री.वसंत धोंडिबा पिटले उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
दि.२८.०३.२०२५	आपले कार्यालयाचे असणारे पत्र दि.०५.०४.०३ (पत्र सोबत देण्यात येत आहे) संदर्भाने तयार असणारी संपूर्ण संचिका याची प्रत (कार्यालयीन टिपणी आदेश अर्जदार यांचे मूळ अर्जाचे प्रत अंतिम करण्याचे अर्ज याचे सह)

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचा कार्यालयीन अभिलेखात शोध घेतला असता सदर माहिती आढळुन आलेली नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.१४.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देण्यात येऊन, मागणी केलेल्या संचिकेचा व अभिलेखाचा शोध घेतला असता सदर संचिका आढळुन आलेली नसल्यामुळे हवी असलेली माहिती या विभागात उपलब्ध नाही, असे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नसल्याकारणाने, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर

केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद दिला असल्याचे दिसुन येत आहे. तथापि अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचा शोध घेऊन ती उपलब्ध झाली नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीदरम्यान अवगत केलेले आहे. ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असणे अपेक्षित आहे. अत: अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस सत्वर प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातुन अधिनियमातील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाथरी, जि.परभणी यांना या प्रकरणी आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाथरी, जि.परभणी यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेल्या माहितीचा कार्यालयातील दोन कर्मचारी यांचा एक गट तयार करुन माहितीचा शोध घ्यावा. अशी कार्यवाही करताना रोजनामा ठेवण्यात येऊन दैनंदिन कामकाजाची नोंद त्यात घेण्यात यावी. या कार्यवाहीदरम्यान उपलब्ध झालेली माहिती अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अशी कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत पूर्ण करावी.

२. वर नमूद केल्याप्रमाणे शोध घेऊन माहिती उपलब्ध न झाल्यास सदर माहितीसंदर्भातील अभिलेख जतन करुन ठेवावयाची जबाबदारी ज्या अधिकारी / कर्मचारी यांची होती त्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाथरी, जि.परभणी यांनी महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील कलम ९ नुसार एफआयआर दाखल करण्याबाबतची कार्यवाही अनुसरावी. अशी कार्यवाही अनुसरताना सर्व वस्तुनिष्ठ बाबी विचारात घेण्यात याव्यात.

३. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5285 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,

१. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी
२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाथरी, जि.परभणी

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १५०१/२०२५
बोर्ड क्र.५४

श्री.सय्यद जाकिर अली सय्यद महमुद अली, — अपिलार्थी
रा.एम.आर.एफ. ट्रान्स्लेशन, काझी वाडा, व्हीआयपी रोड,
छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाथरी, जि.परभणी — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाथरी, जि.परभणी — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१५.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.हेमंत नागोराव सुजलेगावकर उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
दि.११.११.२०२४	हैद्राबाद अतियात चौकशी कायदा १९५२ चे कलम ७ विरासत मंजूर धारक यांचे खान काह कलम चौक, पाथरी या संस्थेच्या सेवेसाठी असलेल्या खिदमतमाश इनामी जमिनीच्या बाबतीत आपणास देण्यात आलेल्या अर्जावर झालेल्या कारवाईचा अहवाल देण्यात यावा,

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जात नमूद विषयाबाबत सादर केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने, उपविभागीय अधिकारी यांनी त्यांच्या दि.१२.०२.२०२५ रोजीच्या पत्राव्दारे तहसिलदार, पाथरी यांना नियमानुसार कारवाई करणेबाबत निर्देशित केलेले आहे. सदर पत्राची प्रत अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात सदर दि.१२.०२.२०२५ रोजीच्या पत्राशिवाय दुसरी कोणतीही माहिती कार्यालयात उपलब्ध नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जात नमूद तक्रारीवर कार्यवाही करण्याची बाब तहसिलदार, पाथरी यांचेशी निगडित आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. माहिती अर्जात नमूद तक्रार अर्जाबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाबाबत जन माहिती अधिकारी यांनी अद्याप कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, तक्रार अर्जावर झालेल्या कार्यवाहीचा अहवाल देण्यात यावा, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमक्ष केलेला युक्तिवाद विचारात घेता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या तक्रार अर्जासंदर्भात उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडुन करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत (दि.१२.०२.२०२५ रोजीचे पत्र) अपिलार्थीस अवगत केलेले आहे. मात्र प्रस्तुत प्रकरणातील माहिती अर्जासंदर्भात अपिलार्थीस प्रतिसाद दिला असल्याचे दिसुन येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादावरुन अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती तहसिल कार्यालय, पाथरी या कार्यालयाशी संबंधित असल्याचे दिसुन येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा माहिती अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) नुसार तहसिल कार्यालय, पाथरी या कार्यालयाकडे हस्तांतरित करणे आवश्यक होते. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अधिनियमातील कलम ६ (३) नुसार हस्तांतरण झाले नसल्यामुळे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती आता जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार माहितीशी संबंधित कार्यालयाकडुन एकत्रित / संकलित करुन अपिलार्थीस द्यावी लागेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाथरी, जि.परभणी यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद माहिती ज्या कार्यालयाशी संबंधित आहे ती त्या कार्यालयाकडुन (तहसिल कार्यालय, पाथरी) अधिनियमातील कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार एकत्रित / संकलित करुन अशी माहिती अपिलार्थीस, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाथरी, जि.परभणी यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5286 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २४५३/२०२५
बोर्ड क्र.५५

श्री.सय्यद जाकिर अली सय्यद महमुद अली, — अपिलार्थी
रा.एम.आर.एफ. ट्रान्स्लेशन, काझी वाडा, व्हीआयपी रोड,
छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहायक महसूल अधिकारी (जमा-२),
तहसिल कार्यालय, पाथरी, जि.परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, पाथरी, जि.परभणी

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१५.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
दि.११.११.२०२४	हैद्राबाद अतियात चौकशी कायदा १९५२ चे कलम ७ विरासत मंजूर धारक यांचे खान काह कलम चौक, पाथरी या संस्थेच्या सेवेसाठी असलेल्या खिदमतमाश इनामी जमिनीच्या बेकायदेशीर हस्तांतरण आणि अतिक्रमण विषयी कारवाई करण्यासाठी भूसुधार, सामान्य प्रशासन, परभणी तर्फे आपणास प्राप्त आदेशावर झालेल्या कारवाईचा अहवाल देण्यात यावा,

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहायक महसूल अधिकारी (जमा-२), तहसिल कार्यालय, पाथरी,

जि.परभणी यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, पाथरी, जि.परभणी यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

५/२/१६

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5287 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४८११/२०२५
बोर्ड क्र.५६

श्री.सय्यद जाकेर अली सय्यद महमुद अली, अपिलार्थी
रा.एम.आर.एफ. ट्रान्सलेशन, एम.आर.एफ. टॉवर, काझी वाडा, टाऊन हॉल, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
महसूल सहायक,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाथरी, जि.परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाथरी, जि.परभणी

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२७.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक, श्री.प्रविण कोकंडे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
दि.०३.०७.२०२५	१९६५ साली देण्यात आलेल्या Copy of Succession Statement च्या नोंदी असलेल्या नोंदवहीच्या पृष्ठांची छायांकित प्रत, प्रकरण नोंदवही (इनाम शाखा), दि.22.11.1965, Copy of Succession Statement Syed Afzal Ahmad Quadri, Feb.1966/22/11/1965 Succetion of Syed Shamsuddin Quadri Case No.309/Inam of 2012 MAG / INAM / VIRASAT / CR

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचा कार्यालयीन अभिलेखात शोध घेतला असता सदर माहिती आढळुन आलेली नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.२०.०५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देण्यात येऊन, मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने कार्यालयातील अभिलेखांची पाहणी केली असता सदर माहिती आढळुन आलेली नाही, त्यामुळे मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देता येत नाही, असे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती अद्यापपावेतो मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध नसल्याचे कळविलेले आहे. परंतु मागणी

केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असणे अपेक्षित आहे. सदर माहितीची नितांत आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद दिला असल्याचे दिसुन येत आहे. तथापि अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचा शोध घेऊन ती उपलब्ध झाली नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीदरम्यान अवगत केलेले आहे. ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असणे अपेक्षित आहे. अत: अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस सत्वर प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातुन अधिनियमातील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाथरी, जि.परभणी यांना या प्रकरणी आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाथरी, जि.परभणी यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेल्या माहितीचा कार्यालयातील दोन कर्मचारी यांचा एक गट तयार करुन माहितीचा शोध घ्यावा. अशी कार्यवाही करताना रोजनामा ठेवण्यात येऊन दैनंदिन कामकाजाची नोंद त्यात घेण्यात यावी. या कार्यवाहीदरम्यान उपलब्ध झालेली माहिती अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अशी कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत पूर्ण करावी.
२. वर नमूद केल्याप्रमाणे शोध घेऊन माहिती उपलब्ध न झाल्यास सदर माहितीसंदर्भातील अभिलेख जतन करुन ठेवावयाची जबाबदारी ज्या अधिकारी / कर्मचारी यांची होती त्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाथरी, जि.परभणी यांनी महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील कलम ९ नुसार एफआयआर दाखल करण्याबाबतची कार्यवाही अनुसरावी. अशी कार्यवाही अनुसरताना सर्व वस्तुनिष्ठ बाबी विचारात घेण्यात याव्यात.
३. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5288 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,

१. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी
२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाथरी, जि.परभणी

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ३०१/२०२५
बोर्ड क्र.५७

श्री.अनवर दिलावर पठाण तडवी,
रा.रोशनपुरा, वालूर, ता.सेलू, जि.परभणी — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
निरीक्षण अधिकारी (पुरवठा),
तहसिल कार्यालय, सेलू, जि.परभणी — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, सेलू, जि.परभणी — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२१.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा निरीक्षण अधिकारी (पुरवठा), श्री.मदन बन्सी यादव उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
२६.०७.२०२४	सेलु तहसिल पुरवठा विभागाने सन २०२२ ते आजपर्यंत तालुक्यात एकुण किती नवीन शिधापत्रिका जारी (वाटप) केले नाव निहाय, वर्ग निहाय, वर्ष निहाय, गावनिहाय यादीच्या छायांकित प्रती,

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२५.११.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन दि.१४.०२.२०२५ रोजीच्या पत्रासोबत अपिलार्थी यांना आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी व्यक्तिश: स्विकारुन दि.१५.०२.२०२५ रोजी माहिती प्राप्त झाली अशी पोच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली

आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि अपिलार्थी यांनी त्यांचे दि.०२.०४.२०२६ रोजीचे लेखी निवेदन आयोगाच्या पटलावर सादर केलेले आहे. या निवेदनामध्ये अपिलार्थी यांनी माहिती मिळाल्याचे व समाधान झाले असल्याचे नमूद केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-5289 दिनांक :-12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४३४/२०२५
बोर्ड क्र.५८

श्री.ज्ञानेश्वर चिमणराव राऊत,
रा.गायत्रीनगर, सेलू, ता.सेलू, जि.परभणी — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
तहसिल कार्यालय, सेलू, जि.परभणी — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, सेलू, जि.परभणी — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२८.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
२५.०९.२०२४	संजय गांधी व निराधार श्रावण बाळ / विधवा पात्र अपात्र यादी मिळणेबाबत, सन २०१६ ते आजपर्यंत, संजय गांधी व श्रावण बाळ या सर्व पात्र लाभार्थी व अपात्र यांची यादी कार्यालयात जाहीर करण्यात आलेल्या छायांकित व साक्षांकित प्रती मिळणेबाबत,

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती व प्रथम अपील अर्जाची दखल घेतली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, दिशाभूल करण्याचा प्रयत्न, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कार्यवाही केलेली नाही. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली

माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, तहसिल कार्यालय, सेलू, जि.परभणी यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क देण्यात यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, तहसिल कार्यालय, सेलू, जि.परभणी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनिय़मातील तरतुदीनुसार मुदतीत सुसंगत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.१०.०६.२०२६ रोजी वेळ सकाळी ११.०० वा. आयोगासमोर व्यक्तिश:** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.०६.११.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.5549 दिनांक :-19/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १९८०/२०२५
बोर्ड क्र.५९

श्री.अनवर दिलावर पठाण तडवी, अपिलार्थी
रा.रोशनपुरा, वालूर, ता.सेलू, जि.परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
सहायक महसूल अधिकारी,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, सेलू, जि.परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, सेलू, जि.परभणी

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१६.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.दत्ता राऊत, सहायक महसूल अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
२५.०१.२०२५ ऑनलाईन	सेलु तालुक्यातील सन ०१ जानेवारी २०२२ ते २० जानेवारी २०२५ पर्यंत मुंबई पोलीस कायदा, १९५१ महाराष्ट्र कलम ५६ अनुसार एकुण किती इसमांना तडीपार (हद्दपार) सुनेच्या (नोटीस) देण्यात आले नावनिहाय, गावनिहाय, वर्ग निहाय, महिनानिहाय, वर्षनिहाय नोटीसाच्या छायांकित प्रत व हद्दपारीच्या हुकुम विरोधात सरकार किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याकडे अपील केलेल्या अपिलाचे छायांकित प्रत,

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित व गोपनीय स्वरुपाची माहिती आहे. काही हद्दपार प्रकरणातील कार्यवाही प्रगतीपथावर असल्याने अशी माहिती उघड केली तर त्याचा विपरित परिणाम सदर प्रकरणातील अंतिम कार्यवाहीवर होण्याची शक्यता नाकारता नाही. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. अत: अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नसल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. आज सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी

त्यांच्या युक्तिवादात अवगत केलेल्या बाबीच्या अनुषंगाने अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसुन येत आहे की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही त्रयस्थपक्षाशी संबंधित तसेच गोपनिय स्वरुपाची आहे. आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि मागणी केलेली माहिती उघड केल्यास नेमके कोणते जनहित साध्य होऊ शकते याबाबत अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये काहीही नमूद केलेले नाही. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीमध्ये अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) नुसार कोणतेही जनहित दिसुन येत नाही. म्हणून अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (छ) व कलम ८ (१) (ज) मधील तरतुदीनुसार देय होणार नाही. प्रसंगावशात, या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कार्यवाही केली असल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन निदर्शनास येत नाही. या बाबीची आयोग गंभीर दखल घेत आहे. भविष्यात अशी पुनरावृत्ती झाल्यास कलम ७ (१) व कलम १९ (६) च्या भंगास जबाबदार धरण्यात येऊन अधिनियमातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित शासन परिपत्रकानुसार यथोचित कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, याची अनुक्रमे संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी गांभिर्याने नोंद घ्यावी.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5290 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २६२५/२०२५
बोर्ड क्र.६०

श्री.अब्दुल मतीन शेख गुलाब, अपिलार्थी
रा.बायजीपुरा, इंदिरा नगर, गल्ली नंबर ३१, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार (महसूल-१),
तहसिल कार्यालय, जिंतूर, जि.परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, जिंतूर, जि.परभणी

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२६.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.दिलीप केरबा गायकवाड उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
दि.१८.०२.२०२५	दि.१६.०१.२०२५ रोजी तहसिलदार साहेबाच्या नावे कार्यवाही करण्याकरिता अर्ज दाखल केलेले आहे, त्या अर्जावर कोणत्या प्रकारे कार्यवाही करण्यात आली याची सविस्तर माहिती,

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, प्रस्तुत प्रकरणाच्या आयोगासमोरील सुनावणीबाबतची सुचना काल संध्याकाळी उशिराने समजली असल्यामुळे व आज रोजी आयोगाकडील सुनावणीकरिता परस्पर हजर झाल्याने अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याबाबत संचिकेच्या अनुपलब्धतेमुळे कोणतेही भाष्य करता येणे शक्य होत नाही. मात्र अपिलार्थीस माहिती मिळाली नसल्यास सदर माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती

देण्यात आली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल-१), तहसिल कार्यालय, जिंतूर, जि.परभणी यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, जिंतूर, जि.परभणी यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

५ २।।३

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5291 दिनांक :- 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ३४६०/२०२५
बोर्ड क्र.६१

श्री.मनोहर मारोती दुधमल, — अपिलार्थी
रा.कावलगाव, ता.पूर्णा, जि.परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
महसूल सहायक,
तहसिल कार्यालय, पूर्णा, जि.परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, पूर्णा, जि.परभणी

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२८.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक, श्री.शेख अकबर शेख महंमद उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
१३.०५.२०२५	१. मौजे कावलगाव येथील सुभाष नारायण सातोरे, मिनाबाई सुभाष सातोरे हे आपले कार्यालयातर्फे कोणत्या योजनेचा लाभ घेतात लेखी माहिती व त्यांचे आधार कार्डाच्या व रेशन कार्डाच्या व पूर्ण फाईलची झेरॉक्स प्रत मिळणेबाबत, २. मौजे कावलगाव येथील ०१ जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४, ०१ जानेवारी २०२५ ते ०३ मे २०२५ चे पात्र अपात्र लाभार्थी याची नावासहीत यादी मिळणे आणि कोणत्या योजनेतुन लाभा घेतात याची माहिती,

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत व व्यापक स्वरुपाची असुन एका पेक्षा जास्त विषयाशी संबंधित आहे. नियमानुसार अपिलार्थीस देय होणारी एका विषयावरील म्हणजे मुद्दा क्र.१ च्या संदर्भातील माहिती दि.१७.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी व्यक्तिश: प्राप्त करुन घेऊन माहिती मिळाली अशी पोच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मागणी केलेली व देय होणारी माहिती उपलब्ध

करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5292 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५६६७/२०२५
बोर्ड क्र.६२

श्री.माऊली दत्तराव भुसारे,
रा.नावकी, ता.पूर्णा, जि.परभणी — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
महसूल सहायक,
तहसिल कार्यालय, पूर्णा, जि.परभणी — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
नायब तहसिलदार (महसूल-१),
तहसिल कार्यालय, पूर्णा, जि.परभणी — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०९.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक, श्री.पल्लवी बालाजी उबाळे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
दि.२४.०६.२०२५	मा.तहसिलदार पूर्णा यांचे आदेशान्वये मौजे नावकी ते विठ्ठल रुक्मीनी मंदीर ते लक्ष्मण नगर पांदन रस्त्याची गट नंबर १२७ लगत रस्त्याची दि.२३.१२.२०१९ ते डिसेंबर २०२० पर्यंत तलाठी व मंडळ अधिकारी तसेच नायब तहसिलदार यांच्या मार्फत झालेल्या स्थळपाहणी पंचनाम्याची तसेच तहसिल न्यायालयाच्या रोजनाम्याची छायांकित प्रत देण्यात यावी,

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापि उपलब्ध करुन दिलेल्या माहितीमध्ये रोजनाम्याची प्रत उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. त्यामुळे उपलब्ध करुन दिलेली माहिती अपूर्ण आहे. सदर रोजनाम्याची आवश्यकता असल्यामुळे ते उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली व अभिलेखात उपलब्ध असलेली सर्व माहिती अपिलार्थी यांना दि.०८.०९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी व्यक्तिश: स्विकारुन पोच दिलेली आहे. आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केल्याप्रमाणे त्यांना रोजनाम्याची प्रत मिळाली नसल्यास सदर

रोजनाम्याची प्रत कार्यालयात उपलब्ध असल्यामुळे ती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अपूर्ण माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे. आज सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. तथापि उपलब्ध करुन दिलेल्या माहितीमध्ये रोजनाम्याची प्रत मिळाली नसल्याचे अपिलार्थी यांनी आज रोजी अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक, तहसिल कार्यालय, पूर्णा, जि.परभणी यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी उर्वरित माहिती (रोजनाम्याची प्रत), आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. नायब तहसिलदार (महसूल-१), तहसिल कार्यालय, पूर्णा, जि.परभणी यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5293 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १४८७/२०२५
बोर्ड क्र.६३

श्री.राजाभाऊ मलिकार्जुन गजमल, — अपिलार्थी
रा.चारठाणा, ता.जिंतूर, जि.परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार (महसूल-१),
तहसिल कार्यालय, जिंतूर, जि.परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, जिंतूर, जि.परभणी

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१५.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.दिलीप केरबा गायकवाड उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
दि.०३.१२.२०२४	मौ.कान्हा, ता.जिंतूर येथील शेत गट क्र.१२७ चा फेरफार क्र.८४३ चा आदेश क्र. ई फेरफार / एस आर / क्र.१५५ / कान्हा, दि.२७.०१.२०२० ची संपूर्ण संचिका सत्यप्रतीत मिळणेबाबत,

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, प्रस्तुत प्रकरणाच्या आयोगासमोरील सुनावणीबाबतची सुचना काल संध्याकाळी उशिराने समजली असल्यामुळे व आज रोजी आयोगाकडील सुनावणीकरिता परस्पर हजर झाल्याने अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याबाबत संचिकेच्या अनुपलब्धतेमुळे कोणतेही भाष्य करता येणे शक्य होत नाही. मात्र अपिलार्थीस माहिती मिळाली नसल्यास सदर माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती

मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल-१), तहसिल कार्यालय, जिंतूर, जि.परभणी यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, जिंतूर, जि.परभणी यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5294 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १५३७/२०२५
बोर्ड क्र.६४

श्री.मुजीब उर रहेमान अब्दुल रशीद, — अपिलार्थी
रा.गल्ली नंबर ३१, इंदिरानगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार (महसूल-१),
तहसिल कार्यालय, जिंतूर, जि.परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, जिंतूर, जि.परभणी

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२१.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.दिलीप केरबा गायकवाड उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
दि.१६.०१.२०२५	१. सर्वे नं.२३५ ही जागा एकुण किती क्षेत्रफळ आहे, शासनाने कोणत्या इ.स.मध्ये सर्वे क्र.२३५ ची किती जागा तलावासाठी अधिग्रहीत केली आहे त्याची सविस्तर माहिती, २. शासनाने सर्वे क्र.२३५ मध्ये तलावासाठी अधिग्रहीत केलेल्या जमिनीचा मोबदला किती दिला आहे व किती लोकांच्या नावे देण्यात आले त्याची सविस्तर माहिती, ३. शासनाने तलावासाठी अधिग्रहीत केलेल्या सर्वे क्र.२३५ ची जमिन यातुन मुरुम उत्खलन परवानगी किती वेळा आणि केव्हा केव्हा देण्यात आली याची सविस्तर माहिती, ४. शासनाने सर्वे नं. २३५ ची आतापर्यंत मालकी हक्काची जमिन यातून मुरुम काढण्याची परवानगी किती वेळा आणि केव्हा केव्हा देण्यात आली त्याची सविस्तर माहिती,

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, प्रस्तुत प्रकरणाच्या आयोगासमोरील

सुनावणीबाबतची सुचना काल संध्याकाळी उशिराने समजली असल्यामुळे व आज रोजी आयोगाकडील सुनावणीकरिता परस्पर हजर झाल्याने अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याबाबत संचिकेच्या अनुपलब्धतेमुळे कोणतेही भाष्य करता येणे शक्य होत नाही. मात्र अपिलार्थीस माहिती मिळाली नसल्यास सदर माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यात आलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता, अशी माहिती अपिलार्थीस अधिनियमातील कलम २ (J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल-१), तहसिल कार्यालय, जिंतूर, जि.परभणी यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, जिंतूर, जि.परभणी यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

५ २।।३

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5295 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १६८०/२०२५
बोर्ड क्र.६५

श्री.पांडुरंग ज्ञानदेव अंभुरे, — अपिलार्थी
रा.गजानन महाराज मंदीर जवळ, गजानन नगर, कारेगाव रोड,
परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार (महसूल-१),
तहसिल कार्यालय, जिंतूर, जि.परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, जिंतूर, जि.परभणी

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२९.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.दिलीप केरबा गायकवाड उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
दि.२४.१२.२०२४	जानेवारी २०१८ ते आजपर्यंत, १. बोरी ते निवळी गावास जाणारा अंदाजे ७० फुट डांबरी सरकारी रस्ता हा गट क्रमांक २०८ किंवा २०९ यापैकी कोणत्या गट क्रमांक मधुन रस्ता गेला आहे याबाबत सत्य पुराव्याची कागदपत्रे मिळणेबाबत, २. डांबरी सरकारी रस्ता ज्या गट मधुन गेला आहे त्या गटातील शेतकऱ्याला कोणता सरकारी मोबदला मिळाला आहे का, त्या बाबतची कागदपत्रे मिळणेबाबत,

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, प्रस्तुत प्रकरणाच्या आयोगासमोरील सुनावणीबाबतची सुचना काल संध्याकाळी उशिराने समजली असल्यामुळे व आज रोजी आयोगाकडील

सुनावणीकरिता परस्पर हजर झाल्याने अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याबाबत संचिकेच्या अनुपलब्धतेमुळे कोणतेही भाष्य करता येणे शक्य होत नाही. मात्र अपिलार्थीस माहिती मिळाली नसल्यास सदर माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल-१), तहसिल कार्यालय, जिंतूर, जि.परभणी यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, जिंतूर, जि.परभणी यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5296 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५४३ व ५४६/२०२५ (०२)
बोर्ड क्र.६६ व ६७

श्रीमती यास्मीन बेगम भ्र. सय्यद इब्राहिम, तर्फे नईमोद्दीन हमीदोद्दीन सिद्दीकी, मॉ.मझील, साहेबजान मस्जिद समोर, एकबाल नगर, परभणी — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा सहायक महसूल अधिकारी, तहसिल कार्यालय, परभणी — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल-१), तहसिल कार्यालय, परभणी — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०३.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती अधिकारी तथा सहायक महसूल अधिकारी, श्री.विकास पांडुरंग सायगुंडे, प्रथम अपिलीय अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.मधुकर आबाराव क्षीरसागर आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
६६	०६.१२.२०२४	१.परभणी तहसिल कार्यालयीन पत्र दि.१४.०६.२०२४ व दि.२५.०६.२०२४ या आपल्या दोन्ही पत्रात मौजे परभणी सर्वे नं.१७५ व मौजे नांदखेडा ता.परभणी येथील गट नं.४६ मध्ये मोजणी दि.१२.०९.२०२३ व दि.०३.०७.२०२३ रोजी कोर्ट मोजणीची कार्यवाही झाली असुन या दोन्ही तारखेचे शेत मोजणी पंचनाम्याची प्रमाणित नक्कल मिळणेबाबत, २. परभणी तहसिल कार्यालयीन पत्र दि.१४.०६.२०२४ व दि.२५.०६.२०२४ या आपल्या दोन्ही पत्रात उल्लेख केलेल्या कोर्टवाटप तक्ता क्षेत्रफळ तक्त्याची प्रमाणित नक्कल मिळणेबाबत, ३.परभणी तहसिल कार्यालयीन पत्र दि.१४.०६.२०२४ व दि.२५.०६.२०२४ या आपल्या दोन्ही पत्रात उल्लेख केलेल्या कोर्टवाटप तक्ता क्षेत्रफळ तक्त्याची प्रमाणित नक्कल मिळणेबाबत, ४. मौजे नांदखेडा ता.परभणी गट नं.४६ शेत जमिनीचा ताबा घेण्यासाठी दि.२४.०६.२०२४ व दि.१६.०७.२०२४ रोजी येणार होते पण आले नाहीत या दोन्ही तारखेचे पंचनाम्याची प्रमाणित नक्कल मिळणेबाबत,

६७	०६.१२.२०२४	परभणी तहसिल कार्यालयाने ५ रुपयाच्या बाँड पेपर आधारे दि.१६.०६.१९९१ रोजी सय्यद बसीर पिता सय्यद अली यांच्या वारसाच्या नावाने मौजे नांदखेडा ता.परभणी गट नं.४६ शेत जमीन केली त्या ५ रुपयाच्या बाँड पेपरच्या प्रमाणित नक्कल मिळणेबाबत,

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली बोर्ड क्र.६६ मधील माहिती परिपूर्ण मिळालेली नाही. ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. बोर्ड क्र. ६७ मधील माहिती अर्जानुसार मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे. याबाबत आता कोणताही उजर राहिलेला नाही.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या बोर्ड क्र.६६ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०५.११.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देण्यात येऊन, अपिलार्थी यांनी मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली सर्व माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच बोर्ड क्र.६७ मधील माहिती अर्जानुसार अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना आज रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांच्या दोनही माहिती अर्जाच्या अनुषंगाने अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आली असल्यामुळे दोनही व्दितीय अपील निकाली काढण्यात यावीत, अशी विनंती आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या दोनही प्रथम अपिलांवर दि.०९.०१.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी बोर्ड क्र.६६ मधील माहिती अर्जाची माहिती मिळाली नसल्याबाबत व बोर्ड क्र.६७ मधील माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे. आज सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस बोर्ड क्र.६६ मधील माहिती अर्जातील माहिती / वस्तुस्थिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. तसेच बोर्ड क्र.६७ मधील माहिती अर्जाची माहिती मिळाली असल्याचे व याबाबत उजर राहिला नसल्याचे अपिलार्थी यांनी आज रोजी सुनावणीदरम्यान अगवत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

उपरोक्त दोनही व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5297 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५४४ व ५४५/२०२५ (०२)
बोर्ड क्र.६८ व ६९

श्री.नईमोद्दीन हमीदोद्दीन सिद्दीकी, — अपिलार्थी
रा.मॉ मझील, साहेबजान मस्जिद समोर, एकबाल नगर, परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
जेष्ठ शिक्षक,
मॉडेल उर्दू प्राथमिक / माध्यमिक स्कूल, गालीब नगर, परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याध्यापक,
मॉडेल उर्दू प्राथमिक / माध्यमिक स्कूल, गालीब नगर, परभणी

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०३.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
६८	१४.०९.२०२४	१. आपल्या प्राथमिक शाळेत मुलींच्या व मुलांच्या तसेच शिक्षकांसाठी एकुण किती शौचालय याची नकाशासहीत सविस्तर माहिती, २. शौचालय सफाई कर्मचारी यांच्या नाव व प्रतीमहा पगारासहीत माहिती, ३. आपल्या शाळेत एकुण किती कॅमेरे लावण्यात आले याचे नकाशासहीत माहिती, ४. प्राथमिक शाळेत विद्यार्थीची एकुण संख्या किती याची माहिती, ५. प्राथमिक शाळेत १ ली ते ४ थी पर्यंत तुकडी संख्या किती याची माहिती, ६. प्राथमिक शाळेत १ ली ते ४ थी पर्यंत प्रत्येक तुकडीमध्ये विद्यार्थी संख्या किती याची माहिती, ७. प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक यांचे नाव व त्यांच्या शिक्षणाची सविस्तर माहिती, ८. प्राथमिक शाळेतील शिक्षकांची एकुण संख्या किती याची माहिती, ९. प्राथमिक शाळेतील शिपाई एकुण संख्या किती याची माहिती,
६९	१७.०९.२०२४	१. आपल्या माध्यमिक शाळेत मुलींच्या व मुलांच्या तसेच शिक्षकांसाठी एकुण किती शौचालय याची नकाशासहीत सविस्तर माहिती, २. शौचालय सफाई कर्मचारी यांच्या

		नाव व प्रतीमहा पगारासहीत माहिती, ३. आपल्या शाळेत एकुण किती कॅमेरे लावण्यात आले याचे नकाशासहीत माहिती, ४. माध्यमिक शाळेत विद्यार्थीची एकुण संख्या किती याची माहिती, ५. माध्यमिक शाळेत १ ली ते ४ थी पर्यंत तुकडी संख्या किती याची माहिती, ६. माध्यमिक शाळेत १ ली ते ४ थी पर्यंत प्रत्येक तुकडीमध्ये विद्यार्थी संख्या किती याची माहिती, ७. माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक यांचे नाव व त्यांच्या शिक्षणाची सविस्तर माहिती, ८. माध्यमिक शाळेतील शिक्षकांची एकुण संख्या किती याची माहिती, ९. माध्यमिक शाळेतील शिपाई एकुण संख्या किती याची माहिती, १०. आपल्या शाळेत विज्ञान प्रयोग हॉल असल्यास त्या हॉलची फोटोसहीत माहिती, ११. आपल्या शाळेत कम्प्युटर लॅब असल्यास त्यामध्ये किती कम्प्युटर एकुण संख्या व त्या हॉलची फोटोसहीत माहिती, १२.आपल्या शाळेत विद्यार्थ्यांना कम्प्युटरचे शिक्षण देणाऱ्या शिक्षकाचे नाव व त्यांचे शिक्षण बदल सविस्तर माहिती, १३. प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना सन २०२४-२०२५ शिक्षण विभाग (प्रा), जिल्हा परिषद परभणी यांचे पत्र जा.क्र./जि.प.शिवि./पीएमपोषण २०२४ च्या आदेशानुसार विद्यार्थ्यांना तीन संरचीत आहारांचा लाभ देण्यात येत असल्यास त्याची माहिती, १४ आपल्या शाळेत प्रती दिन विद्यार्थ्यांना जो आहार दिला जातो त्याचे वेळापत्रक लावण्यात आले असल्यास त्याची त्या भिंतीसह फोटोसहीत सविस्तर माहिती,

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असुन विविध विषयाशी निगडित आहे. अशा स्वरुपातील माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असे माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाहीत. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत.

प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांचे लक्ष मा.सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्याय व इतर अपील नं.६४५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी पारित केलेल्या निर्णयाकडे वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

उपरोक्त दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5602 दिनांक : 19/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाटीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १००३ व १००४/२०२५ (०२)
बोर्ड क्र.७० व ७१

श्री.उध्दव अप्पाराव गरुड,
रा.पिंगळी (बा), ता.जि.परभणी — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्राम महसूल अधिकारी,
सजा पिंगळी (बा), ता.जि.परभणी — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
नायब तहसिलदार (महसूल-१),
तहसिल कार्यालय, परभणी — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१०.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्राम महसूल अधिकारी, श्री.बाबासाहेब गोरे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.मधुकर क्षीरसागर उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
७०	२३.१२.२०२४	१. मौजे पिंगळी बा. सजाचा पदभार स्विकारला त्या दिनांकापासुन ते आपण माहिती उपलब्ध करुन देतील त्या तारखेपर्यंत केलेल्या कार्यविवरण पत्राच्या साक्षांकित प्रती देण्यात याव्यात, २. मौजे पिंगळी (बा) येथील चालु वर्षातील ई-पिक पाहणीसाठी निवड केलेल्या सहायकासाठीची शा.परिपत्रकानुसार आपल्या शिफारशीने व तहसिलदार साहेबानी कोणाच्या शिफारशीने त्रयस्थ व्यक्तीची सहायकाची नेमणूक केली त्याच्या साक्षांकित प्रती देण्यात याव्यात,
७१	१९.१२.२०२४	मौजे पिंगळी बा. येथील सन २०२४-२०२५ मध्ये झालेल्या दुष्काळासाठी तयार केलेल्या यादीची व त्या आधारे V.K. आयडी तयार झाली त्या दोन्हीची साक्षांकित यादी द्यावी,

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे अशी माहिती एकत्रित / संकलित करण्यास काही

कालावधी लागलेला आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये व्यक्तिश: माहिती हवी असल्याचे नमूद केलेले आहे. त्यानुसार सदर एकत्रित / संकलित केलेली माहिती अपिलार्थी यांना व्यक्तिश: देण्याचा प्रयत्न केला असता अपिलार्थी यांनी माहिती स्विकारण्यास नकार दिलेला आहे. म्हणून अपिलार्थी यांनी दोनही माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता सोबत आणलेली आहे. सदर माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या दोनही प्रथम अपिलांवर दि.०५.०२.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे कार्यालयीन वेळेत कार्यालयात येऊन माहिती हस्तगत करणेबाबत अपिलार्थी यांना सुचित करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी सोबत आणलेली आहे. तथापि आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

<u>आदेश</u>

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्राम महसूल अधिकारी, सजा पिंगळी (बा), ता.जि.परभणी यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद दोनही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती (आज रोजी सोबत आणलेली), आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. नायब तहसिलदार (महसूल-१), तहसिल कार्यालय, परभणी यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5633 दिनांक : 19/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २२२८/२०२५
बोर्ड क्र.७२

श्री.असलम अहमद खाँन एकबाल खाँन,
रा.रहेमत नगर, फातिमा शाळेच्या बाजूला, परभणी — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्राम महसूल अधिकारी,
तहसिल कार्यालय, परभणी — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
नायब तहसिलदार (म-१),
तहसिल कार्यालय, परभणी — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०४.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्राम महसूल अधिकारी, श्री.बाबासाहेब गोरे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.मधुकर क्षीरसागर उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
२५.०३.२०२५	शेख आमेर शेख फारुख सदर व्यक्ती EWS प्रमाणपत्र सोबत जोडण्यात आलेले सर्व कागदपत्राची प्रत मिळणे, प्रमाणपत्र क्र.४११८३५१०३२५

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित असल्यामुळे सदर माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. अत: या बाबत आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळणेबाबत, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित असल्याचे दिसुन येत आहे. त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर अधिनियमातील कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार त्रयस्थपक्षास त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे, ही बाब नैसर्गिक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातुन योग्य ठरते. या नंतर माहिती प्रगट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि या प्रकरणी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली

माहिती प्रगट केल्यास नेमके कोणते जनहित साध्य होऊ शकते, याबाबत अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये काहीही नमूद केलेले नाही. सारांशाने अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (ज) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे अशी माहिती अपिलार्थी यांना देय होणार नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5298 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५३४२/२०२५
बोर्ड क्र.७३

श्री.संजयकुमार सुरेंद्र पेदापल्ली, अपिलार्थी
रा.गव्हाणे चौक, धनुकाबाई प्लॉट, परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
सहायक महसूल अधिकारी,
आस्थापना विभाग, तहसिल कार्यालय, परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
नायब तहसिलदार (म-१),
तहसिल कार्यालय, परभणी

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२०.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.मधुकर क्षीरसागर उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
१३.०६.२०२५	लोकसेविका मोहिनी येल्लया चिटटपेल्ली (मोहिनी श्रीनिवास पेदापल्ली) ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) बाबत, बदल खालील माहिती, १.सदर लोकसेविकाने आपल्या किंवा सक्षम कार्यालयात रुजू झाल्यापासुन जमा केलेल्या मत्ता व दायित्वाबाबत सर्व माहिती, २. सदर लोकसेवकांनी मत्ता व दायित्व जमा केले असल्यास दिनांकासह विवरण व जमा न केल्यास त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही केल्याबाबत सर्व माहिती,

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित असुन सदर माहिती शासन परिपत्रक दि.१७.१०.२०१४ रोजीच्या परिपत्रकानुसार उघड करण्यास अपवाद ठरविण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२९.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, मागणी केलेली माहिती शासन परिपत्रक दि.१७.१०.२०१४ नुसार पुरविता येणे शक्य नसल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२६.०८.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे मागणी केलेली माहिती कलम ८ (१) (त्र) नुसार देणे बंधनकारक नसल्याचा निष्कर्ष काढुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील नामंजूर करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, दिशाभूल करणारे उत्तर, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित असल्याचे दिसुन येत आहे. त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर अधिनियमातील कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार त्रयस्थपक्षास त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे, ही बाब नैसर्गिक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातुन योग्य ठरते. या नंतर माहिती प्रगट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि या प्रकरणी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्रगट केल्यास नेमके कोणते जनहित साध्य होऊ शकते, याबाबत अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये काहीही नमूद केलेले नाही. सारांशाने अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे अशी माहिती अपिलार्थी यांना देय होणार नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती व त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद आणि अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२६.०८.२०२५ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5299 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १५३८/२०२५
बोर्ड क्र.७४

श्री. लुकामान अहेमदभाई ठेकीया,
रा.सर्वे नंबर ५७७/०१, सीटीसी नंबर १४७५/३, घर नंबर ९२ व ९३, वॉर्ड १९, ज्ञानोपासक कॉलेजच्या बाजूस, जिंतूर रोड, परभणी — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा सहायक महसूल अधिकारी, तहसिल कार्यालय, परभणी — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा नायब तहसिलदार (म-१), तहसिल कार्यालय, परभणी — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२१.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा सहायक महसूल अधिकारी, श्री.विकास पांडुरंग सायगुंडे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.मधुकर क्षीरसागर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
०९.१२.२०२४	सर्वे क्र.५७७/२ मधील १६ एकर २४ गुंठे जमीन मा.अवर तहसिलदार यांचे आदेश क्र.जमा-२ / कावि दि.०१.०७.२०१६ चे आदेशान्वये सर्वे क्र.५७७/१ मध्ये नोंदी घेण्यात आले त्या संपूर्ण संचिकेची माहिती पत्र मिळणे,

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्यापपावेतो मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील अभिलेखाचा कार्यालयीन अभिलेखामध्ये शोध घेतला असता, सदर अभिलेख आढळुन आला नसल्यामुळे तसेच सदरचा अभिलेख पदभारात मिळाला नसल्यामुळे अशी माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देता येणे शक्य झालेले नाही. सदर मागणी केलेल्या माहितीचा पुन:श्च शोध घेण्याकरिता काही कालावधी उपलब्ध करुन दिल्यास शोध घेऊन उपलब्ध झालेली माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१२.०२.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे, विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळणे, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील अभिलेखाचा शोध घेऊनही ते आढळुन न आल्यामुळे व सदर अभिलेख पदभारात मिळाला नसल्यामुळे माहिती अपिलार्थीस देता आलेली नाही. ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असणे अपेक्षित आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस सत्वर प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातुन अधिनियमातील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार नायब तहसिलदार (म-१), तहसिल कार्यालय, परभणी यांना या प्रकरणी आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल-१), तहसिल कार्यालय, परभणी यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेल्या माहितीचा कार्यालयातील दोन कर्मचारी यांचा एक गट तयार करुन कार्यालयात शोध घ्यावा. अशी कार्यवाही करताना रोजनामा ठेवण्यात येऊन दैनंदिन कामकाजाची नोंद त्यात घेण्यात यावी. या कार्यवाहीदरम्यान उपलब्ध झालेली माहिती अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अशी कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत पूर्ण करावी.

२. वर नमूद केल्याप्रमाणे शोध घेऊन माहिती उपलब्ध न झाल्यास सदर माहितीसंदर्भातील अभिलेख जतन करुन ठेवावयाची जबाबदारी ज्या अधिकारी / कर्मचारी यांची होती त्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द तहसिलदार, तहसिल कार्यालय, परभणी यांनी महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील कलम ९ नुसार एफआयआर दाखल करण्याबाबतची कार्यवाही अनुसरावी. अशी कार्यवाही अनुसरताना सर्व वस्तुनिष्ठ बाबी विचारात घेण्यात याव्यात.

३. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5300 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५४९६/२०२५
बोर्ड क्र.७५

श्री.लुकमान अहमदभाई ठेकीया, अपिलार्थी
रा.ज्ञानोपासक महाविद्यालय बाजूस, जिंतूर रोड, परभण

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
सहायक महसूल अधिकारी,
दंडप्र विभाग (१), तहसिल कार्यालय, परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
नायब तहसिलदार (म-१),
तहसिल कार्यालय, परभणी

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०१.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.मधुकर क्षीरसागर उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
१५.०७.२०२५	१.कार्यकारी दंडाधिकारी परभणी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी कार्यालय परभणी यांचे आदेश क्र.जा.क्र.२०२५/दंडणीय/कावि दि.१६.०५.२०२५ चे आदेशमध्ये कायद्याचे कोणते कलम अंतर्गत आदेश पारित केले त्या बाबत आदेशात दर्शविलेले नाही तरी तो आदेश कोणत्या कायद्याचे कलम अंतर्गत आदेश निर्गमित केले आहे त्याबाबत माहिती द्यावी, २. आदेशामध्ये नियम व कलमांचा उल्लेख लिहणे बंधनकारक असते का, असल्यास व लिहिण्याचे कारणांची संपूर्ण माहिती द्यावी, ३. उक्त आदेशाची कार्यवाही आपल्या अधिकार क्षेत्रात Jurisdiction मध्ये येते का याची माहिती, ४. उक्त आदेशातील मिळकत परभणी महानगरपालिका परभणी हद्दीत असल्याने उपरोक्त कार्यवाही (अतिक्रमण) साठी परभणी महानगरपालिका परभणी कार्यालयाशी संपर्क केला होता का याची माहिती, ५. उक्त आदेशातील मिळकत बाबत उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय परभणीचा अभिप्राय घेतला होता का याची माहिती, ६. उक्त आदेश विरुध्द रिवीजन / अपील किंवा आवाहन कोणते प्राधिकरणाकडे किंवा अपील प्राधिकरणकडे करता येईल याची माहिती,

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०६.११.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे प्रश्नार्थक, अभिप्राय स्वरुपाची माहिती मागितलेली असुन अशी माहिती देणे बंधनकारक नाही. म्हणून अपिलार्थी यांचे प्रथम अपील नामंजूर करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, प्रश्नरुप असल्याचे कारण देऊन माहिती नाकारणे, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने, अधिनियमातील तरतुदीनुसार ज्यावेळी माहितीचा अर्ज प्राप्त होतो त्यावेळी जी माहिती उपलब्ध आहे ती माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे ती त्या स्वरुपातच उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. माहिती तयार करुन देणे, माहितीचे संस्करण करुन देणे, प्रश्नार्थक माहिती देणे, माहिती दुसऱ्या कार्यालयाकडुन प्राप्त करुन घेऊन देणे, एखादी कार्यवाही करुन माहिती देणे, एखाद्या कार्यवाहीमागील कारण / खुलासा देणे, भविष्यात माहिती प्राप्त होईल म्हणून माहितीचा अर्ज प्रलंबित ठेवणे या प्रक्रियेंचा अथवा या स्वरुपातील माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक, अभिप्राय, विश्लेषणात्मक स्वरुपाची असल्याचे दिसुन येत आहे. तथापि अशा स्वरुपातील माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही. म्हणून अशी माहिती अपिलार्थी यांना देय होणार नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5301 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५९८४/२०२५
बोर्ड क्र.७६

श्री.हरिभाऊ कुंडलिक काळे,
रा.मानमोडी, जिंतूर, जि.परभणी — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्राम महसूल अधिकारी,
सजा मालेगाव, ता.जिंतूर, जि.परभणी — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
नायब तहसिलदार (महसूल-१),
तहसिल कार्यालय, जिंतूर, जि.परभणी — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२४.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद. सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.दिलीप केरबा गायकवाड उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
२४.०९.२०२५	या गावावरुन दुसऱ्या गावास जात नसलेला भूमि अभिलेख कार्यालय जिंतूर या ठिकाणी व तहसिल कार्यालय जिंतूर यांच्या अभिलेखात लांबी, रुंदीची नोंद नसलेला व जिथपर्यंत आपण २० फुट रुंद रस्ता मोजुन दिला होता, त्या ठिकाणी गाव नसलेला व शिवेच्या आतच असलेला गाडीमार्ग आपणाकडील ज्या लेखी पुराव्या आधारे गट नं.१२०-१२१-१२७ मधुन जाणारा गाडी मार्ग २० फुट मोजुन दिला होता त्या पुराव्याची छायांकित प्रत,

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती परिपूर्ण मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती अर्धवट, चुकीची आहे. सदर माहिती अर्जानुसार मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जातील मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहे. वास्तविक अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे माहितीची मागणी करताना ती अत्यंत मोघम स्वरुपात केलेली असुन अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती अपेक्षित आहे, याचा नेमका स्पष्ट बोध होत नाही. मात्र अपिलार्थीच्या माहिती अर्जातील माहितीच्या मागणीनुसार जेवढी माहिती देता येणे शक्य आहे तेवढी

माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अर्धवट, चुकीची, मनमानी माहिती दिली व काही माहिती दिलीच नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अर्धवट, चुकीची माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे. अपिलार्थी यांनी आज रोजी आयोगासमक्ष केलेला युक्तिवाद व आयोगाकडे व्दितीय अपील सादर करताना नमूद केलेले प्रयोजन विचारात घेता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. तथापि उपलब्ध करुन दिलेली माहिती अर्धवट व चुकीची असल्याचे अपिलार्थी यांनी आज सुनावणीदरम्यान आयोगास अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची असल्याचे दिसुन येत आहे. तथापि अशा स्वरुपातील माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.5302 दिनांक :12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ६०७४/२०२५
बोर्ड क्र.७७

डॉ.महादेव आश्रुबा कोरसळे,
रा.युसूफ वडगाव, ता.केज, जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
कनिष्ठ प्रशासन अधिकारी (पंचायत),
जिल्हा परिषद, बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),
जिल्हा परिषद, बीड — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.३०.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व अपिलार्थी यांचे विधीज्ञ, श्री.एम.डी.गिते उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
०९.०९.२०२५	दि.१२.१२.२०२४ रोजी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाने ग्रा.वि.अधिकारी युसूफ वडगाव यांच्या चौकशीचा अहवाल मिळणेबाबत,

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे विधीज्ञ यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती व प्रथम अपील अर्जाची दखल घेतली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यात आली नाही तसेच सुनावणीसुध्दा घेण्यात आली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे विधीज्ञ यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कार्यवाही केलेली नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे चौकशी प्रकरणाशी संबंधित माहितीची मागणी केली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, बीड यांनी,

अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार मुदतीत सुसंगत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह दि.१०.०६.२०२६ रोजी वेळ सकाळी ११.०० वा. आयोगासमोर व्यक्तिशः उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१४.१०.२०२५ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5533 दिनांक : 15/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५९२५/२०२५
बोर्ड क्र.७८

श्री.विनायक विश्वनाथ मोराळे, अपिलार्थी
रा.वडजी, पो.कडकनाथवाडी, ता.वाशी, जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
सहायक महसूल अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग (अभिलेख विभाग), जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
नायब तहसिलदार,
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२२.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
दि.२७.०८.२०२५ (प्राप्त दि.०४.०९.२०२५)	खालील प्रकरणासंदर्भातील आदेशाची प्रमाणित झेरॉक्स प्रत उपलब्ध करुन द्यावी, वादी / प्रतिवाद - विश्वनाथ भाऊराव मोराळे व इतर विरुध्द बाबू किसन कोळी व इतर फाईल क्रमांक - 96/ROR/Appeal/kv-1570,1571 निर्णयाची दिनांक 10.04.2000 निर्णय देणारे अधिकारी - A.P.Pathal, Sub Divisional officer, Osmanabad कार्यालय - उपजिल्हाधिकारी (जमीन महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव (उस्मानाबाद) वरील फाईल आपल्या शाखेत / रेकॉर्डमध्ये उपलब्ध नसेल तर इतर शाखामध्ये / कार्यालय / न्यायालयमध्ये पाठवल्याचा पुरावा अथवा नोंद असलेला रजिस्टर तपासुन त्याची प्रमाणित झेरॉक्स प्रत पुरवावी,

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती उपलब्ध करुन द्यावी, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा माहिती अर्ज दि.१५.०९.२०२५ रोजीच्या पत्रासोबत उपविभागीय अधिकारी कार्यालय, धाराशिव या कार्यालयाकडे कलम ६ (३) नुसार वर्ग केलेला आहे.

अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती दुसऱ्या कार्यालयाशी / प्राधिकरणाशी संबंधित असल्यास अशा माहितीकरिता अपिलार्थी यांचा माहिती अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) नुसार जास्तीत जास्त पाच दिवसात माहितीशी संबंधित कार्यालयाकडे / प्राधिकरणाकडे हस्तांतरित करणे आवश्यक आहे. मात्र या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे कलम ६ (३) नुसार मुदतीत हस्तांतरण झाले असल्याचे दिसुन येत नाही. म्हणून अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आता अधिनियमातील कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार माहितीशी संबंधित कार्यालयाकडुन एकत्रित / संकलित करुन अपिलार्थीस द्यावी लागेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहायक महसूल अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग (अभिलेख विभाग), जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली माहिती ज्या कार्यालयाशी / प्राधिकरणाशी संबंधित आहे ती त्या कार्यालयाकडुन / प्राधिकरणाकडुन (उपविभागीय अधिकारी कार्यालय, धाराशिव) अधिनियमातील कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार एकत्रित / संकलित करुन अशी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तहसिलदार, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5303 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
तहसिलदार, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५९२६/२०२५
बोर्ड क्र.७९

श्री.विनायक विश्वनाथ मोराळे,
रा.वडजी, पो.कडकनाथवाडी, ता.वाशी, जि.धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक महसूल अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग (अभिलेख विभाग), जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
नायब तहसिलदार,
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२२.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
दि.२७.०८.२०२५ (प्राप्त दि.०४.०९.२०२५)	खालील प्रकरणासंदर्भातील आदेशाची प्रमाणित झेरॉक्स प्रत उपलब्ध करुन द्यावी, वादी / प्रतिवाद - श्रीमती सीताबाई मोराळे व इतर विरुध्द दगडू पिता दाजी व इतर फाईल क्रमांक - 143/38-E/1959, 280/38-E/1959 निर्णयाची दिनांक 12.11.1960 निर्णय देणारे अधिकारी - जिल्हाधिकारी कार्यालय - जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव (उस्मानाबाद) वरील फाईल आपल्या शाखेत / रेकॉर्डमध्ये उपलब्ध नसेल तर इतर शाखामध्ये / कार्यालय / न्यायालयमध्ये पाठवल्याचा पुरावा अथवा नोंद असलेला रजिस्टर तपासुन त्याची प्रमाणित झेरॉक्स प्रत पुरवावी,

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती उपलब्ध करुन द्यावी, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.१५.०९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, मागणी केलेल्या माहितीचा (संचिकेचा) अभिलेख विभागात शोध घेण्यात येत असुन संचिका मिळुन येताच माहिती पुरविण्याची दक्षता घेत असल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या

प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१८.११.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, संचिकेचा शोध घेऊन १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी तथा अभिलेखपाल, अभिलेख कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांना आदेशित केलेले आहे. तथापि सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा अभिलेखपाल, अभिलेख कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तहसिलदार, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5304 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,

१. तहसिलदार, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव
२. जन माहिती अधिकारी तथा अभिलेखपाल, अभिलेख कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५९२७/२०२५
बोर्ड क्र.८०

श्री.विनायक विश्वनाथ मोराळे, अपिलार्थी
रा.वडजी, पो.कडकनाथवाडी, ता.वाशी, जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
सहायक महसूल अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग (अभिलेख विभाग), जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
नायब तहसिलदार,
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२२.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
दि.२७.०८.२०२५ (प्राप्त दि.०४.०९.२०२५)	खालील प्रकरणासंदर्भातील आदेशाची प्रमाणित झेरॉक्स प्रत उपलब्ध करुन द्यावी, वादी / प्रतिवाद - बाबु किसन कोळी व इतर विरुध्द विश्वनाथ भाऊराव मोराळे व इतर फाईल क्रमांक - 1981/TNC/38E(1)6 निर्णयाची दिनांक 22.02.1999 निर्णय देणारे अधिकारी - Addl.Tahsildar, T-Kallam, Dist. Osmanabad कार्यालय - Office of Addl.Tahsildar, Osmanabad वरील फाईल आपल्या शाखेत / रेकॉर्डमध्ये उपलब्ध नसेल तर इतर शाखामध्ये / कार्यालय / न्यायालयमध्ये पाठवल्याचा पुरावा अथवा नोंद असलेला रजिस्टर तपासुन त्याची प्रमाणित झेरॉक्स प्रत पुरवावी,

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती उपलब्ध करुन द्यावी, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा माहिती अर्ज दि.१५.०९.२०२५ रोजीच्या पत्रासोबत तहसिल कार्यालय, वाशी / कळंब, जि.धाराशिव या कार्यालयाकडे कलम ६ (३) नुसार वर्ग केलेला आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती दुसऱ्या कार्यालयाशी / प्राधिकरणाशी संबंधित असल्यास अशा माहितीकरिता

अपिलार्थी यांचा माहिती अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) नुसार जास्तीत जास्त पाच दिवसात माहितीशी संबंधित कार्यालयाकडे / प्राधिकरणाकडे हस्तांतरित करणे आवश्यक आहे. मात्र या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे कलम ६ (३) नुसार मुदतीत हस्तांतरण झाले असल्याचे दिसुन येत नाही. म्हणून अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आता अधिनियमातील कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार माहितीशी संबंधित कार्यालयाकडुन एकत्रित / संकलित करुन अपिलार्थीस द्यावी लागेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहायक महसूल अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग (अभिलेख विभाग), जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली माहिती ज्या कार्यालयाशी / प्राधिकरणाशी संबंधित आहे ती त्या कार्यालयाकडुन / प्राधिकरणाकडुन (तहसिल कार्यालय, वाशी / कळंब, जि.धाराशिव) अधिनियमातील कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार एकत्रित / संकलित करुन अशी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तहसिलदार, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.5305 दिनांक :12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
तहसिलदार, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५९९७/२०२५
बोर्ड क्र.८१

श्री.महेश भिवा गायकवाड, — अपिलार्थी
रा.शिरजापूर, ता.तुळजापूर, जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार (निवडणूक),
तहसिल कार्यालय, तुळजापूर, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, तुळजापूर, जि.धाराशिव

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२४.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाटी अपिलार्थी व अपिलार्थी यांचे विधीज्ञ, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.एम.एम.वाघोलीकर, ग्राम महसूल अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
३०.०६.२०२५	ग्रा.पं.निवडणूक १९९५ ते २००० व २००५ ते २०१० मधील सरपंच पदाचे आरक्षणाची प्रोसेडिंग नक्कल मिळणेबाबत,

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे विधीज्ञ यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती माहिती अर्जातील मागणी प्रमाणे मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती चुकीची व अपूर्ण आहे. सदर मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती सन १९९५ ते २०१० या कालावधीमधील आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली सर्व माहिती एकत्रित / संकलित करुन दि.२८.०७.२०२५ रोजीच्या पत्रासोबत अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०९.१०.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचा निष्कर्ष काढुन प्रथम अपील नामंजूर केलेले आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती

अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली असल्यामुळे व उपलब्ध करुन दिलेल्या माहितीशिवाय दुसरी कोणतीही माहिती अभिलेखात उपलब्ध नसल्यामुळे अपील निकाली काढण्यात यावे, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, खोटी माहिती दिली, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे विधीज्ञ यांनी अपूर्ण व चुकीची माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे. आज सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीसंदर्भात अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे देखील संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5306 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर - ४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५९९८/२०२५
बोर्ड क्र.८२

श्री.माणिक मारुती सुपनार,
रा.आशिष निवास, एम.जी.रोड, श्रीकृष्ण मंदीर मागे, मु.पो.उरुळी कांचन, ता.हवेली, जि.पुणे — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार (सा.प्र.),
जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२४.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
०४.०९.२०२५	राज्य माहिती आयोग, खंडपीठ छ.संभाजीनगर यांचे आदेशानुसार खालीलप्रमाणे केली होती त्या बाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती, १. राज्य माहिती आयोगाचे आदेश व्दितीय अपील क्र.१०८३७/२०२१ दि.२०.१०.२०२३ व आदेश क्र. तक्रार क्रमांक १५१७/२०२४ दि.१९.१२.२०२४ नुसार सदर प्रकरणाची तात्काळ अंमलबजावणी करणेची विनंती केली आहेत त्यानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती, २. सदर आदेशामधील तरतुदीनुसार मा.अ.अ.२००५ कलम २० चा भंग केल्याने माहिती आयोगाने २५ हजर रुपये दंड इतकी शास्तीची रक्कम अंतिम करण्यात आली असल्याने त्यांच्याकडुन शास्तीची रक्कम वसुल करण्याची पावती मिळणेबाबत विनंती केली होती त्यानुसार केलेली कार्यवाहीची माहिती, ३. तसेच सदर प्रकरणात आयोगासमोर उपलब्ध असलेल्या अभिलेखावरुन आयोगाने आदेश पारित केल्यानुसार सदर प्रकरणात वर्तमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, श्री.बोळगे, तुळजापूर, जि.धाराशिव यांना पंधरा दिवसात सदर प्रकरणाची अंमलबजावणी करावी असे आदेशात नमूद केले होते, त्यानुसार तहसिल कार्यालय यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती मिळणेबाबत, सोबत दि.०२.०८.२०२५ चा अर्ज व राज्य माहिती आयोग यांचे दोन्ही आदेश,

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नसलेबाबत, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा माहिती अर्ज दि.११.०९.२०२५ रोजीच्या पत्रासोबत उपविभागीय अधिकारी कार्यालय, धाराशिव व तहसिल कार्यालय, तुळजापूर, जि.धाराशिव या कार्यालयाकडे अधिनियमातील कलम ६ (३) नुसार वर्ग केलेला आहे. सदर वर्ग केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने संबंधित कार्यालयाने अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत नाही. अत: अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस सत्वर प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातुन तहसिलदार (सा.प्र.), जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांना माहिती अधिकारी अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार या प्रकरणी आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार (सा.प्र), जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उपजिल्हाधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 5307 दिनांक : 12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
उपजिल्हाधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५९९९/२०२५
बोर्ड क्र.८३

श्री.माणिक मारुती सुपनार, अपिलार्थी
रा.आशिष निवास, एम.जी.रोड, श्रीकृष्ण मंदीर मागे, मु.पो.उरुळी कांचन, ता.हवेली, जि.पुणे

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
सहायक प्रशासन अधिकारी,
पंचायत विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),
जिल्हा परिषद, धाराशिव

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२४.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
२४.०९.२०२५	दि.०६.०९.२०२५ च्या अर्जानुसार व तक्रार ग्रामपंचायत बारुळ, ता.तुळजापूर, जि.धाराशिव येथील ग्रामसेवक श्री.प्रशांत भोसले यांचेकडे विनंती अर्ज दि.१८.०७.२०२५ माहिती अधिकारात अर्ज दि.०४.०८.२०२५ व प्रथम अपील दि.०५.०९.२०२५ रोजी केले होते, सदर बाबत कसलाही प्रतिसाद व मागितलेली माहिती देखील देण्यास नकार दिल्याने याबाबत आपल्या कार्यालयाकडे दि.०६.०९.२०२५ रोजी श्री.प्रशांत भोसले विरुध्द तक्रार व दफ्तर दिरंगाई शिस्तभंगाची कठोर कार्यवाही करणेबाबत विनंती व मागणी केली होती, त्यानुसार आपल्या कार्यालयाने केलेली कार्यवाहीची माहिती व तपशिलवार माहिती मिळणेबाबत, सोबत दि.०६.०९.२०२५ रोजीच्या तक्रार अर्जाची प्रत,

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन होत नाही. मात्र अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नसलेबाबत, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, धाराशिव यांनी,

अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-5308 दिनांक :-12/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
उपजिल्हाधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५९५२/२०२५
बोर्ड क्र.८४

श्री.चंद्रकांत रंगनाथ गरड, — अपिलार्थी
रा.धुळे सोलापूर रोड, गणपती मंदीर, येडशी, ता.जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, येडशी, ता.जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२३.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
२९.०५.२०२५	१. श्री.चंद्रकांत रंगनाथ गरुड यांचा दि.०८.०३.२०२३, दि.०५.०९.२०२३ व दि.१३.०९.२०२३ चा अर्ज व त्या सोबत सादर केलेल्या पुराव्याच्या सर्व साक्षांकित प्रती, २. पंचायत समिती धाराशिव यांचे पत्र क्र.पंसउ/पंचायत-३/कावि/२३५०/२०२३, दि.२१.०९.२०२३ ची साक्षांकित प्रत, ३. श्री.सुर्यकांत गरड यांना वाटणी झाली नाही त्याबाबतच्या कागदपत्राच्या साक्षांकित प्रती, ४. आपण सुर्यकांत गरड यांना वाटणी झाली नाही याबाबत पत्र दिले असेल त्या पत्राची साक्षांकित प्रत, जर पत्र दिले नसेल तर पत्र का दिले नाही याचे सबब कारण स्वतंत्र पत्राव्दारे व आपल्या अभिप्रायासह मला अवगत करावे, ५. ग्रा.पं.मिळकत क्र.२००४-०५ ते २०२३-२४ या कालावधीत श्री.सुर्यकांत गरड यांनी ग्रामपंचायत कर भरलेल्या पावत्यांच्या छायांकित प्रती / अथवा रोकड वहीमध्ये नोंदी केलेल्या तपशिलासह साक्षांकित प्रती (उदा.अ.क्र., नाव, घर क्र., कालावधी, रक्कम व आर्थिक वर्षानुसार माहिती देण्यात यावी), ६. महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी शुल्क नियम १९६० मधील पोट नियम क्र.१५ ची साक्षांकित प्रत देण्यात यावी,

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन १५ दिवसाच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि या नंतरही जन माहिती

अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाची दखल घेतली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यात आली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२५.०९.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसुन येत नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कार्यवाही केली असल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसुन येत नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता, अशी माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम २ (J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, येडशी, ता.जि.धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, येडशी, ता.जि.धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार मुदतीत सुसंगत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह दि.१०.०६.२०२६ रोजी वेळ सकाळी ११.०० वा. आयोगासमोर व्यक्तिशः उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.5532 दिनांक :15/5/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धाराशिव